बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ५१ | बुधवार,दि.२३ नोव्हेंबर २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध


# जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील स्वच्छता अभियानाचे बोलके दृश्य



**गोंदिया**–जिल्ह्यात स्वच्छता मोहिम राबविण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी आढावा बैठक घेऊन निर्देश देत असतात.मात्र याच विभागप्रमुखांच्या कार्यालयात स्वच्छता बघितल्यावर दिव्याखाली अंधार अशी म्हणण्याची वेळ आली आहे.स्वतःच्याच कार्यालयात स्वच्छतेसाठी लाखो रुपयाचे कंत्राट देऊनही स्वच्छता ठेवण्यात हे विभागप्रमुख अपयशी ठरले आहेत.विशेष म्हणजे १९ नोव्हेबंरला तर स्वच्छ शौचालय दिन पाळण्यात आले.त्यादृष्टीने विचार केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वच्छतागृहातील वरील शौचालयाचे चित्र बघितल्यावर लोका सांगे ब्रम्हज्ञान आपण कोरडे पाषाण या म्हणीसारखे दिसून येते.जिल्हा नियोजन विभागाच्या सभागृहातील हॉलमधील शौचालयासह निवडणुक विभागाच्या शेजारी असलेल्या वऱ्हाडंयातील शौचालयाची अवस्था बघितल्यावर स्वच्छ शौचालय दिन कार्यक्रमाचा शासकीय कार्यालयातच फज्जा उडाल्याचे दिसून येत आहे.तर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षांचे कक्ष असलेल्या प्रवेशद्वारावर अशी घाण गेल्या कित्येक महिन्यापासून पडून असताना ते स्वच्छ करण्याकडे स्वच्छता विभागातील कर्मचारी कसे विसरले हा प्रश्न निर्माण झालेला आहे.विशेष म्हणजे याच प्रवेशदाराच्या शेजारी खालच्या भागात गेल्या एक आठवड्यापासून दारूची बाटली कोपऱ्यावर पडून असल्याचे दिसून येत असल्याने जि.प.मध्ये चाललेय तरी काय अशी म्हणण्याची वेळ आली आहे.

## महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग करणाऱ्या लेखा व वित्त अधिकाऱ्याला अटक

### गडचिरोली जिल्हा परिषदेत खळबळ

गडचिरोली–कार्यालयातील महिला कर्मचाऱ्याला आपल्या कक्षात बोलावून विनयभंग करणाऱ्या गडचिरोली जिल्हा परिषदेतील लेखा व वित्त अधिकाऱ्याला पोलिसांनी सोमवारी(दि.२१) अटक केल्याने एकच खळबळ उडाली आहे. ओमकार अंबपकर (५४, रा. कोल्हापूर) असे अटक झालेल्या अधिकाऱ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला कर्मचारी ही गडचिरोली जिल्हा परिषदेत कार्यरत आहे. आरोपी लेखा व वित्त अधिकारी ओमकार अंबपकर याने १६,१७ व १८ नोव्हेंबरला लागोपाठ तीन दिवस पीडित महिला कर्मचाऱ्याला कार्यालयीन कामाच्या बहाण्याने आपल्या कक्षात बोलावून नको त्या ठिकाणी स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. सततचा त्रास सहन न झाल्याने पीडितेने आरोपी लेखा व वित्त अधिकाऱ्याविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी सोमवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास शहरातील मुख्य रस्त्यावरुनच अंबपकर याला अटक केली. त्याच्यावर विनयभंगासह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसारही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## कुटूंब नियोजनात जिल्हा माघारला



**गोंदिया:** शासनाच्या वतीने दरवर्षी कुटूंब नियोजन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातू शासनाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्याला वार्षिक उद्दिष्ट ठरवून दिले जाते.गोंदिया जिल्ह्याला यावर्षी ९ हजार २०० कुटूंब नियोजन शस्त्रक्रियांचे उद्दिष्ट देण्यात आले.मात्र गेल्या १० महिन्यात संबंधित विभागाला केवळ २ हजार ८९५ महिला व पुरुषांवर कुटूंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया करण्यात यश आले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार पहिल्या किंवा दुसऱ्या अपत्यानंतर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया कार्यक्रमातंर्गत नसबंदी शस्त्रक्रिया केली जाते.दोन अपत्य झाल्यानंतर बहुतांश लाभाथी कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करतात. यानुसार यंदाच्या चालू आर्थिक वर्षात गोंदिया जिल्ह्याला शासनाकडून ९ हजार २०० कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. ज्यामध्ये ८ हजार ४३५ महिला व ७६५ पुरुपुषांवर शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे संबंधित विभागाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान उद्दिष्ट पूर्ततेसाठी आरोग्य विभागात असलेल्या परिचारिका व आरोग्य सेवकांकडून लाभार्थ्यांना मार्गदर्शन करुन कुटूंब नियोजन योजनेचा लाभ घेण्याचे कायम फायदे आहेत, याची माहिती दिली. मात्र हे करत असतना विशिष्ट कालावधीत हे लक्ष साध्य करणे हे आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांसाठी आव्हानापेक्षा कमी नाही. असे असले तरी दिलेले उद्दिष्ट निर्धारित कालावधीत पूर्ण होईल, अशी आशा होती. मात्र जिल्ह्यातील संबंधित विभाग उद्दिष्ट पूर्ण करण्यात माघारल्याचे चित्र दिसून येत आहे.

राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार कुटुंब नियोजन कार्यक्रमात पुरुषांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्किोनातून गोंदिया जिल्ह्यात "जागतिक पुरुष नसबंदी पंधरवाडा" दि. २१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२२ या कालावधीत साजरा करण्यात येणार आहे. ह्या पंधरवाड्याचे ब्रीद वाक्य पुरुष निभावतील जबाबदारी, कुटुंब नियोजनातील सहभागाने दाखवतील आपली भागीदारी असे आहे.तरी या कालावधीत जास्तीत जास्त पुरुषांनी माझे कुटुंब माझी जबाबदारी या प्रेरणेतून पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी केले आहे.

## विद्युत तारेच्या स्पर्शाने सारस जोडप्याचा मृत्यू

**गोंदिया**–एकीकडे जिल्ह्यात सारस संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न सुरु असल्याचे जिल्हा प्रशासनाच्यावतीने दाखवण्यात येत असले तरी प्रत्यक्षात मात्र कुठेतरी प्रशासन सारस संवर्धनाकडे दुर्लक्ष करते की काय अशी म्हणायची वेळ आली आहे.कारण आज मंगळवारला गोंदिया तालुक्यातील कामठा येथील आश्रमशाळेच्या परिसरात एका सारस जोडप्याचा विद्युत तारांच्या स्पर्शाने मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. सारस संख्या वाढविण्यासाठी जोडपे टिकवणे आवश्यक आहे.

सारस जोडा ५ वर्षाचा होता. सारस नर पक्ष्याची लांबी ५ फूट ८ इंच व मादा पक्ष्याची लांबी ५ फूट ४ इंच एवढी असून पशुवैद्यकीय अधिकारी यांनी उत्तरीय तपासणी केल्यानंतर



मृत जोडप्याला वनअधिकारी व सारस प्रेमीच्या उपस्थितीत जाळण्यात आले.५ ते ७ दिवसापुर्वीच या सारस जोडप्याचा विद्युत प्रवाहाने मृत्यू झाला असावा असा अंदाज वर्तविण्यात येत असून घटना मात्र आज उघडकीस आली.

या घटनेने जिल्ह्यात २०२२ मध्ये असलेली ३६ ही संख्या आता ३४ वर येऊन ठेपली आहे.३ वर्षात दासगाव २,परसवाडा १ व पांजरा येथे १ सारस पक्ष्याचा मृत्यू झालेला होता.आज परत २२ डिसेंबरला दोन सारस पक्ष्यांचा मृत्यू झालेला आहे.

सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी परिसरात असलेल्या विद्युत तारांना आवरण घालणे किंवा केबलचा वापर करणे आवश्यक असल्याचा प्रस्ताव संवर्धन आराखड्यात सादर करण्यात आला आहे.मात्र यासाठी मोठ्या निधीची गरज असून प्रशासनाने याकडे प्राधान्याने लक्ष द्यायला हवे.आज एका जोडप्याच्या मृत्यूमुळे सारस पक्ष्यांच्या संख्या वाढविण्यासाठी जे प्रयत्न सुरु आहेत.त्यावर कुठेतरी अशा घटनेमुळे अडचणी येऊ लागल्याचे सेवा संस्थेचे अध्यक्ष सावन बहेकार यांनी सांगितले.

## हैदराबादला पाठविले ६९ संशयितांचे नमुने

**गोंदिया:** या वर्षात गोवरचे ३ तर रुबेलाचे ३ रुग्ण आढळल्याने खळबळ माजली आहे. आरोग्य विभाग ॲक्शन मोडवर आले असून संशयीत ६९ जणांचे नमुने तपासणीसाठी हैदराबादला पाठविले आहे. तसेच गोवरची लक्षणे आढळल्यास आरोग्य विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे. राज्यात काही भागात गोवर विषाणू संसर्ग काही रुग्ण आढळून आले आहेत. मुंबई वरुन गोंदिया जिल्ह्यात कामास्तव लोकांचे ये–जा सुरु असते. त्यामुळे गोवर विषाणू संसर्ग होण्याची शक्यता आहे. यापूर्वी जिल्ह्यात गोवरचे तीन व रुबेलाचे ४ रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे राज्यात गोवर विषाणूचा वाढता संसर्ग पाहता आरोग्य विभाग सजग झाले आहे. जनजागृतीसह खबरदारीचे उपाययोजना केल्या जात आहे. यातंर्गत आतापर्यंत ५५७ मुलांना गोवर, रुबेलाचा पहिला डोस दिला आहे. दुसरा डोज ३५७ मुलांना दिला आहे.

जिल्ह्यात एम.आर.१ लसीकरणाचे चे १४० ( तालुकानिहाय आमगाव ७०, सडक अर्जुनी २३, व व अर्जुनी मोरगाव ४७ ) एम.आर.२ लसीकरणाचे चे ३८ (आमगाव ३८) बालकांनी लसीकरण घेतलेले नाही. या सर्वांनी त्वरित आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविका/ आरोग्य सेविका यांच्याशी संपर्क साधुन लसीकरण करुन घेण्याचे आवाहन डॉ.नितीन वानखेडे व अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. डी. बी. सुतार यांनी केले आहे.

## पी.जी.शहारे राज्य उपाध्यक्ष तर कार्तिक चव्हाण विभागीय सहसचिवपदी निवड




**गोंदिया:** सरकारी क्षेत्रांमध्ये आऊटसोर्सिंग सारख्या संकल्पनांना कडवटपणे विरोध करु, प्रसंगी दिल्लीत आंदोलन छेडू, पण शासकीय क्षेत्राचे खासगीकरण करण्याचे केंद्र सरकारचे मनसुबे पूर्ण होऊ देणार नाहीत, असा इशारा जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाने दिला आहे. महासंघाचे राज्यव्यापी १४ वे अधिवेशन संत जनार्दन स्वामी मठात आयोजित करण्यात आले होते. या दोन दिवसीय अधिवेशनाचा समारोप रविवारी दुपारी झाला.

यावेळी मंचावर मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अशोक दगडे, सरचिटणीस विश्वास काटकार, राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले, ग्रामसेवक युनियनचे संजीव निकम, महासंघाचे अरुण आहेर आदी मान्यवर उपस्थित होते. समारोपाच्या सत्रामध्ये सकाळी अधिवेशनाचा अहवाल मांडण्यात आला. मागणी ठरावांना यावेळी पदाधिकाऱ्यांनी उत्तरे दिली.

कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले म्हणाले, शासकीय परिघात राबविली जाणारी खासगीकरणाची धोरणे नव्या पिढ्यांसाठी अत्यंत घातक आहेत. सरकारच्या या धोरणांमुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या नव्या पिढ्यांसमोर अनेक प्रश्न निर्माण होतील. शासनातील तब्बल ३५ टक्के रिक्त पदे भरण्यात यावीत, बक्षी समिती खंड क्रमांक–२ हा प्रकाशित करण्यात यावा. या खंडामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटीवर प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.या अधिवेशनात गोंदिया जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष पी.जी.शहारे यांची राज्य उपाध्यक्ष तर ग्रामसेवक संघटनेचे मानद अध्यक्ष कार्तिक चव्हाण यांची नागपूर विभागीय सहसचिव पदावर नियुक्ती करण्यात आली.

या अधिवेशनाला गोंदिया जिल्हा परिषद महासंघाचे अध्यक्ष पी.जी.शहारे, सचिव शैलेष बैस,कोषाध्यक्ष सुभाष खत्री,ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष कमलेश बिसेन,मानद अध्यक्ष कार्तिक चव्हाण, रामा जमईवार,नरेंद्र अतकरी,लिपीक वर्ग कर्मचारी संघटनेच अध्यक्ष संतोष तोमर,सचिव सौरभ अग्रवाल, हेमराज मदनकर,भगीरथ नेवारे,दिलीप चावके आदि सहभागी झाले होते.

### जुनी पेंशन योजना सर्व कर्मचाऱ्यांना लागू करा

- ☆संपाच्या अधिकाराचा फायदा घ्यावा
- ☆आऊटसोर्सिंगद्वारे कंत्राटी कर्मचारी भरती पद्धत रद्द करुन नियमित भरती करा
- ☆केंद्राप्रमाणे राज्यातील कर्मचाऱ्यांनाही सर्व भत्ते लागू करा
- ☆लिपीक, लेखा, ग्रामसेवक, नर्स, परिचर,वाहनचालक आदि कर्मचाऱ्यांच्या ६ व्या व ७ व्या वेतनत्रुटी संदर्भातील सुधारणांची अंमलबजावणी करा

## सारस पक्ष्यांच्या संवर्धनासाठी मिळणार १० हजाराची प्रोत्साहन रक्कम



**गोंदिया :** सारस गणनेनुसार महाराष्ट्र राज्यात ३७ तर मध्यप्रदेशात ४५ सारस पक्षी आढळले. मागच्यावर्षीच्या तुलनेत महाराष्ट्रात ४ व मध्यप्रदेशात २ सारसांची संख्या कमी झाली ही चिंतेची बाब ठरली होती. सारस बचावाकरीता न्यायालयाने निर्देश दिल्यानंतरही मागील वर्षीच्या तुलनेत सारस पक्ष्यांची कमी झालेली संख्या प्रशासनाच्या नियोजनातील अभाव दर्शवणारी ठरली होती. आता जिल्ह्याचे वैभव आणि निसर्ग सौंदर्याची प्रतिक असलेल्या सारस पक्षाच्या संवर्धनासाठी आणि त्यांच्यासाठी घरटे बांधणऱ्या "सारस मित्रांना" प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या वन विभागाने पुढाकार घेतला आहे; वनमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या संदर्भात मुंबई येथे बैठक घेवून पक्षाचे संवर्धन करणाऱ्या शेतमालाच्या प्रोत्साहनात्मक बक्षीसाकरीता तरतूद करण्याचा महत्वपुर्ण निर्णय व्याघ्र प्रकल्पाच्या नियामक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

गोंदिया जिल्ह्यात खाजगी जमीनीवर सारस पक्षांना घरटे बांधल्यावर घरट्यांचे व पक्ष्यांचे संवर्धन करणाऱ्यास प्रोत्साहनात्मक रक्कम देण्याची तरतूद करण्यात आली होती. सारस पक्षाचे घरटे असलेल्या शेत मालकास व लागून भातशेती करणाऱ्या शेतमालकांना दरवर्षी किमान १० हजार रुपये प्रोत्साहनात्मक रक्कम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाघ व वैनगंगा नदी महाराष्ट्रातील गोंदिया तसेच मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्ह्याला विभाजित करते. भौगोलिक दृष्टीकोणातून नदीच्या दोन्ही बाजूला जैवविविधतेत समानता पाहिली जाते. सारस पक्ष्यांना भ्रमंतीकरिता किंबहुना विश्रांतीकरिता हे स्थळ योग्य आहे. म्हणूनच जिल्ह्यात सारस पक्ष्यांचा अधिवास टिकून आहे. सारस पक्ष्यांचा विणीचा हंगाम संपून सारसपक्षी पिलांना घेऊन जाईपर्यंत शेतमालकाने सारसपक्षांना संरक्षण देण्यात यावे ; याबाबत पाहणीनंतर खात्री झाल्यावर ही रक्कम देण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यातील वाघ नदी तसेच गोंदिया व भंडारा जिल्ह्याच्या सिमेवरुन वाहणाऱ्या वैनगंगा नदीचे खोरे व त्यालगत असलेल्या भाताच्या शेतीत तसेच तलावामध्ये सारस पक्ष्यांचे अस्तित्व आहे. सारस हा स्थानिक स्थलांतर करणारा पक्षी असून दलदल व पानस्थळ पर्यावरण हा त्याचा मुख्य अधिवास आहे. हा पक्षी या दोन जिल्ह्यावरील भूभाग तसेच मध्यप्रदेश मधील बालाघाट परिसरात आढळतो. सारस पक्षी गोंदिया जिल्ह्याचे वैभव व सौंदर्याचे प्रतिक आहे. सारस पक्ष्यांचे संरक्षण व संवर्धनकरिता शेतकरी, पक्षी प्रेमी, विद्यार्थी यांच्यासह वनविभाग प्रयत्न करीत आहे.

### महाराष्ट्र मध्यप्रदेश राज्य सारस संख्या

| | |
|---|---|
| **२०२२** | |
| गोंदिया | –३६ |
| बालाघाट | –४५ |
| भंडारा | –०३ |
| **२०२१** | |
| बालाघाट | –४७ |
| गोंदिया | –३९ |
| भंडारा | –०२ |
| **२०२०** | |
| गोंदिया | –४५ |
| बालाघाट | –५६ |
| भंडारा | –०२ |
| चंद्रपूर | –०१ |

### धान उत्पादकांना मिळणार दिलासा

**एकदा जोडी तयार झाल्यानंतर ती कायम स्वरुपी टिकते. अनुकूल असलेल्या क्षेत्रातच सारस पक्ष्यांचे अस्तित्व मर्यादित राहिले आहे. हा सर्वभक्षी पक्षी असून किडे, कीटक, धान्य, गवताचे वीज, सरपटणारे प्राणी हे त्याचे मुख्य अन्न आहे. या निर्णयांमुळे नैसर्गिक साधनसंपत्ती व जैवविधितेने समृध्द असलेल्या गोंदिया जिल्ह्यात सारस पक्षांचे व त्यांच्या घरटयांचे संवर्धन होणार आहे.**

**सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री तथा वनमंत्री**

**वर्षभरातील सारस पक्ष्यांचे विश्रांतीस्थळ, प्रजनन अधिवास, तथा भोजनासाठी प्रयुक्त भ्रमण याचा अभ्यास केला गेला. सोबतच सारसाचे अधिवास व त्यांच्या आसपास असलेल्या शेतकऱ्यांना सारस पक्ष्याचे महत्त्व सांगण्यात आले. संरक्षण व संवर्धनासाठी प्रेरीत करण्यात आले.सारस संरक्षणासाठी शेतकरी आणि स्वयंसेवी संस्थांसह प्रशासकीय पातळीवर विशेष प्रयत्न करण्याची गरज होती. पालकमंत्री यांच्या पुढाकाराने घेतलेला हा निर्णय सारसप्रेमींसाठी महत्वाचा असून या क्षेत्रात काम करीत असलेल्या युवकांना सामावून घेतल्याने अजून युवकांमध्ये सारस संवर्धनाकरीता उत्साह निर्माण होईल.**

**सावन बहेकार, सेवा संस्था अध्यक्ष**

## पंधराव्या वित्त आयोगातून ग्रामपंचायतींना २४ कोटींचा निधी

**गोंदिया:** पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२२–२३ च्या पहिल्या हप्त्यापोटी गोंदिया जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतीसाठी २३ कोटी ७० लाख ६१ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामुळे जिल्ह्यातील ग्राम पंचायती मालामाल होणार असून, विकासकामांनाही गती मिळणार आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गाव, पाडे व वाड्यातील ग्रामस्थांना मूलभूत सुविधा मिळाव्यात, यासाठी विविध योजनांतर्गत केंद्र व राज्य सरकारकडून थेट निधी उपलब्ध करून देण्यात येते. याम ाध्यमातून ग्रामीण भागाचा सर्वांगिण साधून गावांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा मुख्य उद्देश आहे. निधी उपलब्ध करून देण्यात आलेल्यांतर्गत रस्ते, नाले, पथदिवे, स्वच्छ पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा आदि बाबींवर स्थानिक स्वराज्य संस्थांना खर्च करता येते.

१५ व्या वित्त आयोगाच्या सन २०२२–२३ या आर्थिक वर्षात ग्रामीण भागाचे विकास व्हावा, या अनुसंगाने पहिल्या हपत्यापोटी निधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. वितरित निधीतून पंचायत राज संस्थांनी ग्राम पंचायत विकास आराखडानुसार कामे व उपक्रमाची अंमलबजावणी करावी, अशा सुचना शासन निर्णयाच्या माध्यमातून देण्यात आले आहेत. यामुळे गोंदिया जिल्ह्यातील ५३७ ग्राम पंचायती पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीमुळे मालामाल झाले आहेत. तीन लेखा शिर्षकातंर्गत जिल्ह्यातील ग्राम पंचायतींना २३ कोटी ७० लाख ६१ हजाराचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

### उपलब्ध निधी व तालुकानिहाय ग्रा.पं. संख्या

- ११ कोटी ३५ लाख १८ हजार – गोंदिया तालुका (१०८ ग्रा. पं.)
- २ कोटी ९४ लाख १७ हजार – तिरोडा तालुका ( ९३ ग्रा. पं.)
- १ कोटी ८९ लाख ७२ हजार – आमगाव तालुका (५७ ग्रा. पं.)
- १ कोटी ६२ लाख २७ हजार – सालेकसा तालुका (४१ ग्रा. पं.)
- १ कोटी ९९ लाख ३७ हजार – देवरी तालुका (५४ ग्रा. पं.)
- २ कोटी २३ लाख १८ हजार – गोरेगाव तालुका (५४ ग्रा. पं.)
- २ कोटी १६ लाख २७ हजार – सडक अर्जुनी तालुका (६२ ग्रा. पं.)
- २ कोटी ६६ लाख १४ हजार – अर्जुनी मोरगाव तालुका (६८ ग्रा.पं.)
- तसेच अनटायटल लेखाशिर्षकातंर्गत २ कोटी ५५ लाख ८१ हजार




### प्रशासक नियुक्त ग्रापंची निधी थांबविली

**सध्या राज्यात ग्राम पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका होत आहेत. त्यामुळे पंचवार्षिक कार्यकाळ संपुष्टात आलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. १५ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीचा विनियोग सुव्यवस्थित व लोकोपयोगी व्हावा, या दृष्किोनातून प्रशासक कार्यरत आहेत. अशा ग्राम पंचायतींना तुर्त निधी वितरण केले जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश शासनाकडून देण्यात आले आहे.**

## संपादकीय

# भारत "जोडो" यात्रा समतेसाठी



जेव्हा सारे काही सुरळीत असते, अचानक अंगात आल्याप्रमाणे काहीतरी बरळून समाजातील वातावरण गढूळ करण्याचे काम काही वाचाळवीर सोशल मिडियाच्या माध्यमातून अधूनमधून करीत असतात. असे अकलेचे तारे तोडणारे वीर जवळजवळ सर्वच पक्षांमध्ये असतात. त्यांच्या बरळण्याने एकसंध असलेला समाजमन गढूळ होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशी मुक्ताफळे उधळणाऱ्यांना वेळीच चाप लावणे ही काळाची गरज आहे,परंतु अंधभक्त आणि त्यांच्यासाठी काम करणाऱ्या सोशल मिडियावरील आंधळ्या माध्यमांनाही कोण सागंणार हे वारंवार सिद्ध झाले आहे.अशा लोकांच्या मुक्ताफळांना आपल्याजवळ स्थान न देता भारतामध्ये गेल्या काही वर्षात धर्मांधतेच्या नावावर करण्यात आलेल्या दुषीत वातावरणालाच नव्हे तर बेरोजगारी,नोकरी,सुरक्षासारख्या शेतकरी शेजमजुरांच्या समस्यांकडे काँग्रेसच्या राहुल गांधीनी काढलेली भारत जोडो यात्रा ही स्वातंत्र्य काळात निघालेल्या महात्मा गांधीच्या दांडी यात्रेची जाणिव करुन देऊ लागली आहे.या राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेमुळे मात्र आंधळ्याझालेल्या भक्तांना व माध्यमांनाही चांगलीच चपराक मिळालेली आहे.


राहुल गांधी यांनी कन्याकुमारी ते काश्मीर अशी "भारत जोडो' यात्रा सुरू केली आहे. ही दक्षिणेतील राज्यांमधून आपल्या महाराष्ट्रात येऊन ती आज बुधवारला सकाळी मध्यप्रदेशातील बुरहानपुरला पोहोचणार आहे.या यात्रेचे महाराष्ट्रात आगमन होताच काही का होईना मरगळलेल्या काँग्रेसला जिवंतपणा या यात्रेच्या माध्यमातून मिळालेला आहे.कुठल्याही पक्षावर व्यक्तीगत टिका टिप्पणी न करता निघालेली ही यात्रा सर्वच स्तरातली लोकांशी संवाद साधत आहे.त्यातही राहुल गांधींनी आपल्या साधेपणाचा दिलेला परिचय आणि यात्रेदरम्यान मिळालेल्या शेतकरी,महिला,विद्यार्थ्यांसह सामाजिक जाणिवेच्या लोकांशी सवांद साधतांना संघर्ष करा घाबरण्याची गरज नाही,फक्त लढण्याची शक्ती मनात ठेवा हा मंत्र जो दिला.त्यापासून अनेकांना नवीन ऊर्जा तर मिळाली,मात्र या यात्रेपासून अंधभक्तांना प्रतित्युतरही मिळाले आहे.सावरकरांच्या नावावर गदारोळ करुन भारत जोडो यात्रेला बदनाम करण्यासाठी सरसावलेल्या भक्तांना मात्र शिवाजी महाराजांचा अवमान करणारे प्रिय वाटू लागले ही खरी या महाराष्ट्राची शोकातिंक ठरली. यात्रा वाशिम येथे पोहोचताच राहुल गांधीनी सावरकरांबद्दल केलेल्या वक्तव्यावर आकंडतांडव निर्माण कऱण्याचा प्रयत्न केला.मात्र राहुल गांधीनीही त्याचपध्दतीने कागदोपत्री पुरावे सादर करुन उत्तर दिले.राहुल गांधीनी पत्रकाराच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याचे धाडस जे केले त्यापध्दतीचे धाडस अंधभक्त व विरोधक ज्यांना डोक्यावर घेऊन नाचतात त्यांनीही आजपर्यंत केले नाही,हे सत्य त्यांना नाकारता येणं कठिण आहे.

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघासाठीच सावरकर हे आहेत.मात्र सुटकेसाठी इंग्रजांना माफीनामे पाठवायला सुरुवात केली. नंतरच्या काळात सावरकरांनी वेगळ्या नावाने स्वत:वर पुस्तक लिहून स्वतंचीच स्तुती करवून घेतली.मात्र त्यांच्यासारख्या शेकडो महाराष्ट्राच्या पुत्रांनी त्याच अंदमानमध्ये इंग्रजाच्या विरोधात लढा देत शिक्षा भोगली पण त्यांनी माफीनामा लिहिला नाही.ते खरे आमचे स्वातंत्र्यवीर आहेत हे सुध्दा विसरता येणार नाही. सावरकरांना इंग्रजांकडून पेन्शन मिळायची. ते इंग्रजांसाठी काँग्रेस पक्षाविरोधात काम करायचे, असे गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केले. सावरकर यांनी इंग्रजांना माफीनामा लिहून दिला होता. महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू वल्लभभाई पटेल हे अनेक वर्षे तुरुंगात राहिले, पण त्यांनी कोणताही माफीनामा लिहिला नाही. सावरकरांनी घाबरल्यामुळेच माफीनाम्यावर सही केली. सावरकरांनी त्यावेळी एक प्रकारे स्वातंत्र्यलढ्यातील इतर नेत्यांना दगा दिला, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे. "मी तुमचा नोकर राहू इच्छितो', असे सावरकर यांनी पत्रात म्हटल्याचेही राहुल गांधी यांनी अधोरेखित केले,हे सर्व कागदोपत्री पुराव्याच्या आधारे परंतु याने सत्ताधारी लोकांच्या मनात जी भिती यात्रेच्या निमित्ताने तयार झाली होती,ती व्यक्त करायला संधी मिळाली ती खरी म्हणजे सावरकरांच्या निमित्तानेच म्हणावे लागेल.

यानंतर राहुल गांधींच्या या वक्तव्यावर सर्वच स्तरांतून आणि प्रमुख पक्षांकडून जोरदार टीका झाली. पण त्यानंतरही वक्तव्यावर ठाम असल्याचे म्हणत सावरकरांच्या पत्राचे पुरावे सादर करत राहुल गांधींनी त्यांच्या वक्तव्याचा पुनरुच्चार केला होता. त्यांच्या या वक्तव्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळात पडसाद उमटले. "भारत जोडो' यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी सावरकरांबद्दल केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे राज्यातील वातावरण तापवण्याचा प्रयत्न करण्यात आला.मात्र त्याचवेळी शिवरायांवर अवमानकारक टिका भाजपचे प्रवक्ते व राज्यपालांनी केल्यावर सावरकरासांठी ओरडणारे मात्र गप्प का बसले हाच प्रश्न जनता विचारु लागली. आणि राज्यपालांविरुध्द राज्यभर "जोडे मारो' आंदोलन आणि निदर्शने करण्यात येत आहेत. राहुल यांच्या भारत जोडो यात्रेने महाराष्ट्राच नव्हे तर देशातील इतर राज्यातही चिंतन मनन सुरु झाल्याने विरोधक आत्ता ही यात्रा थांबवा आणि त्यांना हे कायद्याचे राज्य असल्याचे दाखवून द्या, अशी मागणी करायला लागणे म्हणजे राहुल गांधीच्या भारत जोडो यात्रेला मिळालेले जनतेचे समर्थन कुठेतरी विरोधकांच्या पोटात दुखणारे ठरले हे नक्कीच म्हणावे लागले.या यात्रेमुळे वंचित बहुजन मागास आदिवासी समाजात कुठे तरी नवी एक आशा निर्माण होऊ लागली असून जातनिहाय जनगणना आवश्यक असल्याचे यात्रेच्या निमित्ताने जयराम रमेश यांनी केलेले वक्तव्यही या यात्रेसाठी महत्वाचे ठरले आहे.यासाठी राहुल गांधीनीही बोलते होणे आवश्यक झाले आहे.

## ककोडी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कम्युनिटी पोलिसिंगवर मार्गदर्शन

**गोंदिया:**–जिल्ह्यातील पोलीस स्टेशन चिचगड अंतर्गत येत असलेल्या शासकीय आश्रमशाळा ककोडी येथे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस दलाचे आधुनिकीकरण अंतर्गत कम्युनिटी पोलिसिंग जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन नुकतचे करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये चांगले नितिमूल्ये रुजवून त्यांना जबाबदार नागरिक बनवणे तसेच कम्युनिटी पोलिसिंगच्या माध्यमातून जनमानसात पोलीस विभागाप्रती सहानभूती निर्माण करण्यावर माहिती देण्यात आली.



या कार्यक्रमात अंधश्रद्धा निर्मूलन, बाल लैगिक अत्याचार, ऑनलाईन फसवणूक, भ्रष्टाचार निर्मुलनवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गुन्ह्यास प्रतिबंध, पोलीस स्टेशनचे कामकाज, सायबर काईमबाबत माहिती, महिला व बालकांची सुरक्षितता,रस्ते अपघात व नियम जागरूकता, नक्षल विरोधी जागरूकता, हत्यार व दारुगोळा बाबत माहिती आणि कम्युनिटी पोलिसिंग बाबत व्यापक चळवळ राबवण्याबाबत माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. हे आयोजन अप्पर पोलिस अधीक्षक कॅम्प देवरीचे अशोक बनकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांचे मार्गदर्शनाखाली चिचगडचे ठाणेदार शरद पाटील यांच्यावतीने करण्यात आले होते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# धान खरेदी केंद्र संस्थेच्या हितासाठी नव्हे तर शेतकरीहितासाठी-डीएमओ बाजपेयी



**गोंदिया:** जिल्ह्यात केंद्रसरकारच्या हमीभाव योजनेतंर्गत आधारभूत किमतीवर धान खरेदी केंद्राना मंजुरी मिळाली असून धान खरेदी करणाऱ्या संस्थानी आपण शेतकरी हितासाठी काम करतोय ही भावना ठेवून खरेदी करताना पारदर्शकपणे काम करावे अशा सुचना जिल्हा मार्केटिंग अधिकारी मनोज बाजपेयी यांनी दिल्या.सोबतच धान खरेदी ही आफलाईन नसून आनलाईन आहे. याप्रकियेतील सर्वच गोष्टी आँनलाईन असल्याने कुणीही ऑफलाईन काम करु नये. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्ह्यातील धान खरेदी संस्था,ग्रेडर,संचालक व संगणक ऑफरेटर यांच्या बैठकीत ते बोलत होते.

यावर्षी ४० क्विंटल प्रती हेक्टरी धान खरेदी करण्यात येणार आहे. गेल्या वर्षभरात ज्या काही समस्या समोर आल्या, काही गोष्टी घडल्या, त्या पुन्हा घडू नये याकरीता सर्वांनी कागदोपत्री कामकाज व्यवस्थित करणे आवश्यक असल्याचे सागंत धान खरेदी केंद्र हे संस्थासाठी चालवले जातेय हा संभ्रम दूर करुन हे केंद्र शेतकरी वर्गाकरीता आहे, हे स्विकारणे आवश्यक आहे, असेही बाजपेयी म्हणाले. संस्थाना केंद्रावर धान खरेदी करतांना काही शेतकरी,राजकीय व्यक्ती व इतरांच्या दबावामुळे काही काम करताना चुका होतात,त्या चूका टाळण्यासाठी शासन नियमाप्रमाणे काम केल्यास कुणीही संस्थावर दबाव आणणार नसल्याचे सांगितले.

चालू हंगामात धान खरेदी करताना संस्थाचालकांनी कर्मचारीवर्ग, ग्रेडर व इतर कर्मचारी यांचे संस्थेच्या ठरावावर लेखी घ्यावे तसेच त्यांच्यासोबत करारपत्र करुन घ्यावे आणि धान खरेदी केंद्र सुरु करण्यासाठी मार्केटिंग फेडरेशनसोबतचे करारनामे त्वरीत सुरु करावे अशा सचुना केल्या. या बैठकीला जिल्ह्यातील सर्व धान खरेदी संस्थाचे संचालक, ग्रेडर, केंद्रप्रमुख, व्यवस्थापक व सगंणक ऑफरेटर उपस्थित होते.

## श्रध्दांजली कार्यक्रमात गोंदियातून हजारोच्या संख्येत गोवारी बांधव सहभागी होणार, रेल्वे प्रशासनाला निवेदन

**गोंदिया :** नागपूर येथील झिरो मैल सिताबडी येथे शहिद आदिवासी गोवारी समाज बांधवाच्या स्मृति प्रित्यर्थ आदिवासी गोवारी स्मारक तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी राज्यभरातून आदिवासी गोंड–गोवारी समाज बांधव दरवर्षी २३ नोव्हेंबर या दिवशी एकत्रित येवून श्रध्दांजली वाहत असतात. यंदाही श्रध्दांजली वाहण्यासाठी गोंदियातून हजारोच्या संख्येत आदिवासी गोंड–गोवारी समाज बांधव सहभागी होणार आहेत. यासाठी आदिवासी गोवारी समाज संघटन महाराष्ट्र गोंदिया शाखा अध्यक्ष सुशिल राऊत यांच्या नेतृत्वात पुर्वसुचना म्हणून रेल्वे प्रबंधक व शहर पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

आदिवासी गोवारी समाज बांधवाकडून २३ नोव्हेंबर १९९४ ला आपल्या न्याय मागणीकरीता नागपूर हिवाळी अधिवेशनावर भव्य मोर्चा काढण्यात आला होता. त्यात मागण्या पूर्ण न होता ११४ गोवारी बंधू–भगिनी शहिद झाले. त्यांच्या स्मृति प्रित्यर्थ नागपूरच्या हृदयस्थळी झिरो मैल सिताबर्डी नागपूर येथे आदिवासी गोवारी स्मारक तयार करण्यात आले आहे. या ठिकाणी ११४ शहिदाच्या स्मरणार्थ दरवर्षी २३ नोव्हेंबर रोजी जनसमुदाय उसळत असतो. यंदाही २३ नोव्हेंबर रोजी श्रध्दांजली कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी गोंदियातून हजारोच्या संख्येत आदिवासी गोंड–गोवारी समाज बांधव सहभागी होणार आहेत. याची पुर्वसूचना म्हणून आदिवासी गोवारी समाज संघटन महाराष्ट्र गोंदिया शाखा अध्यक्ष सुशिल राऊत यांच्या नेतृत्वात पुर्वसुचना म्हणून रेल्वे प्रबंधक व शहर पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

निवेदनाच्या माध्यमातून २३ नोव्हेंबर रोजी सकाळी महाराष्ट्र एक्सप्रेसने आदिवासी गोंड–गोवारी समाज बांधव रवाना होणार असून रेल्वे प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होवू, अशी विनंती करण्यात आली आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, शहर पोलिस निरीक्षक, तहसीलदार गोंदिया आदिंना देण्यात आली आहे. यावेळी सुरज जोशी, अरूण काळसर्पे, वसंत नेवारे व शशिकांत कोहळे यांच्यासह समाज संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# भूमि अभिलेख विभागात सरळसेवा भरती

**गोंदिया:** भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमुह ४ (भूकरमापक तथा लिपीक) संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता ९ डिसेंबर, २०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

त्यानुसार ९ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत. त्यानंतर सदर अर्जदार यांना विभागाकडून २८ फेब्रूवारी ते १३ मार्च, २०२२ या कालावधीत छाननी अर्ज भरण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली होती.

छाननी अर्ज प्रक्रियेमध्ये उमेदवार यांनी अपलोड केलेल्या सर्व प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येवून भूमि अभिलेख विभागातील गट क पदांच्या सेवाप्रवेश नियामांनुसार जाहिरातील नमूद केलेल्या अर्हतेऐवजी इतर अर्हतेबाबत प्रमाणपत्र अपलोड केलेली आहेत. अशा उमेदवारांना अपात्र ठरवून संपूर्ण प्रक्रियेअंती पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामान्य प्रशासन विभागाकडील ४ मे २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन परीक्षा (Computer Based Test) २८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत खइझड कंपनी मार्फत महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

# कार्यकर्त्यांनी निवडणुकीत सक्रियतेने सहभागी व्हावे : राजेंद्र जैन




**गोरेगाव:** जिल्ह्यात सध्या ३४८ ग्राम पंचायतीसाठी निवडणूका होणार आहेत. त्याचप्रमाणे आगामी काळात नगर परिषद व नगर पंचायतीच्या निवडणूका होणार आहेत. जास्तीत जास्त स्थानिक स्वराज्य संस्थावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सत्ता काबीज करावी, या दृष्टीकोनातून कार्यकर्त्यांनी सक्रियेतेने निवडणुकीत सहभागी व्हावे, कसलेही मतभेद न बाळगता पक्ष बळकटीच्या अनुसंगाने कामाला लागावे, अशी सूचना माजी आमदार राजेंद्र जैन यांनी कार्यकर्त्यांना दिले. गोरेगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक व पक्ष बळकटीच्या अनुसंगाने आढावा सभा घेण्यात आली. या बैठकीला संबोधित करताना जैन बोलत होते.

माजी आमदार जैन पुढे म्हणाले, आमचे नेते खा. प्रफुल पटेल हे सातत्याने जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्नरत आहेत. या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा, यासाठी त्यांची धडपड असते. शेतकऱ्यांवर होणाऱ्या प्रत्येक अन्यायाला वाचा फोडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कधीही मागे राहिली नाही. शिवाय ग्राम पंचायत असो की नागरी संस्थाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी खेचून आणण्याचे काम खा. प्रफुल पटेल यांनी केले. त्यामुळेच आज जिल्हा विकासाच्या दिशेने वाटचाल करीत आहे. खा.प्रफुल पटेल यांनी कधीही लहान–मोठे असा भेदभाव बाळगून काम केले नाही. सकारात्मक विचारातून केलेले काम ते विकासाचेच झाले आहेत. आमच्याकडे क्षमतावान नेतृत्व आहे. हे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम तुमच्या हाती आहे. म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांवर राष्ट्रवादी काँग्रेसचेच वर्चस्व रहावे, या अनुसंगाने कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असा सल्ला त्यांनी दिला. त्याचबरोबर गोरेगाव तालुक्यात होणाऱ्या ग्राम पंचायत निवडणुकीचा त्यांनी आढावा घेतला. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, बोपचे, शाहिना हकीम, राजलक्ष्मी तुरकर, केवल बघेले, कल्पना बहेकार, कृष्णकुमार बिसेन, ललिता फुंडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा परिषद लिपिक वर्गीय संघटनेच्या अध्यक्षपदी तोमर तर सरचिटणीसपदी अग्रवाल

**गोंदिया:** जिल्हा परिषद कर्मचारी महासंघातर्गत येणाऱ्या लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेच्या पुनर्गठनकरिता १५ नोव्हेंबरला महासंघ कार्यालयांत मावळते अध्यक्ष सुभाष खत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत संघटनेचे पुनर्गठण करण्यात आले. यात सर्वानुमते अध्यक्षपदी संतोष तोमर यांची निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्ष लिलाधर तिबुडे, कार्याध्यक्ष कावळे, सरचिटणीस सौरभ अग्रवाल, कोषाध्यक्ष मनोज मानकर तर प्रसिद्धी प्रमूख म्हणून गितेश तिजारे यांची निवड करण्यात आली.

संतोष तोमर व सौरभ अग्रवाल यांनी पदभार सांभाळताच जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत सर्व लिपिक वर्गीय कर्मचारी यांच्या न्याय मागण्या जिल्हा प्रशासन व राज्य शासनाच्या स्तरावर पुर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.





# शहर पोलिसांची कामगिरी,वाजपेयी वॉर्डातील घरफोडीचे आरोपी गजाआड

**गोंदिया:**– स्थानिक वाजपेयी वॉर्ड येथील एका घरात घरफोडी करून दागिण्यासह एकूण २५ हजारांचा माल १३ व १४ नोव्हेंबर दरम्यान अज्ञात चोरट्यांनी लंपास केला होता. या घटनेचा तपास करीत गोंदिया शहर पोलिसांनी तीन आरोपींना गजाआड करण्यात यश मिळविले आहे. दोन्ही आरोपीकडून २२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. उदय उर्फ आऊ रमेश उपाध्याय (वय १९) रा. नंगपुरा मुरी, खालिद आसिफ शेख (वय १९) रा. चंद्रशेखर वॉर्ड, अविनाश उर्फ नाम्या शिवसाजन खोब्रागडे (वय २३) रा. सिंगलटोली अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींचे नाव आहे.



सविस्तर असे की, वाजपेयी वॉर्डातील फिर्यादी बाहेरगावी गेले असताना मौका साधून अज्ञात चोरट्यांनी १३ व १४ नोव्हेंबर दरम्यान लाकडी कपात तोडून दागिणे व रोख रक्कम असा एकूण २५ हजाराचा माल लंपास केला होता. या प्रकरणी गोंदिया शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. दरम्यान, शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार चंद्रकांत सुर्यवंशी यांनी स्थानिक गुन्हे प्रकटीकरण पथकाला तपासकामाला लावले. पोलिसांनी शोधचक्र फिरवून गुप्त माहितीच्या आधारावर उदय उर्फ आऊ रमेश उपाध्याय (वय १९) रा. नंगपुरा मुरी, खालिद आसिफ शेख (वय १९) रा. चंद्रशेखर वॉर्ड, अविनाश उर्फ नाम्या शिवसाजन खोब्रागडे (वय २३) रा. सिंगलटोली या तिघांना ताब्यात घेतले.

दरम्यान, त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी वाजपेयी वॉर्डात घरफोडी केल्याची कबूली दिली. यावरून आरोपीकडून २२ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि चंद्रकांत सुर्यवंशी यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेचे सपोनि सागर पाटील, पोहवा सुदेश टेंभरे, जागेश्वर उईके, चव्हाण, सुबोध बिसेन, प्रमोद चव्हाण, सतिश शेंडे, ओमेश्वर मेश्राम, अरविंद चौधरी, दीपक रहांगडाले, मुकेश रावते, कुणाल बारेवार, पुरूषोत्तम देशमुख, विकास वेदक, दिनेश बिसेन यांनी केली.

# त्रिकोणीय अनुबंध: पुष्पा चौधरी, नागेश चौधरी, आणि बहुजन संघर्ष

'पुष्पा चौधरी, नागेश चौधरी आणि बहुजन संघर्ष' हे पुष्पा चौधरी लिखित चरित्रात्मक ऐतिहासिक पुस्तक बहुजन संघर्ष प्रकाशनाचे नुकतेच प्रकाशित झाले. त्याला आत्मचरित्र म्हणावे, की चरित्र म्हणावे, की चळवळीचा ऐतिहासिक अभिलेख हे निश्चितपणे वर्गीकृत करता येत नाही. खुद लेखिका पुष्पा चौधरी यांच्या जीवनाचा त्यात काही भाग असल्याने ते आत्मचरित्र या प्रकारचे वाटू शकेल. नागेश चौधरी यांच्या जीवनाचे वास्तव त्यातून समोर येत असल्याने ते चरित्रात्मक वाटेल. तर ज्या मबहुजन संघर्षच्या इर्दगिर्द त्यांचे दोघांचे सहजीवन फुलत गेले, त्या जीवनाची वाटचाल, अनेक उपक्रम, नाना टप्प्यांवरचा संघर्ष प्रस्तुत पुस्तकातून विशद केला आहे, या अंगाने हे पुस्तक ऐतिहासिक दस्तऐवज या प्रकारातील चळवळीचे संदर्भ मूल्य देणारे वाटेल. 'पुष्पाताई–नागेशभाऊ–बहुजन संघर्ष' यांच्यातील त्रिकोणीय अनुबंध पृथकपणे सांगता येणे पण फार अवघड असेच वाटावे.

नागेशभाऊ म्हणजे बहुजन चळवळीतील उत्तुंग व्यक्तिमत्व होय, हे या पुस्तकातून अलगदपणे रेखाटले आहे. त्यांच्या जीवन प्रवासात पुष्पाताईची साथ अद्वितीय अशी आहे. दोघांचेही एकत्र येणे, सहजीवनाचा एक भाग म्हणून, बहुजन संघर्ष आणि विविध उपक्रम यासाठीची एकमेकांना तोला–मोलाची साथ असणे, कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलत सामाजिक कार्यात आगेकूच करणे आणि वैचारिक परखडपणा, निर्भिडपणा दाखवून, विचार मांडत राहणे, चळवळीत येणाऱ्या पठारावस्थेची तमा न बाळगता सातत्याने काम करत राहणे, ह्या बाबी प्रस्तुत पुस्तकातून नजरेस भरणाऱ्या आहेत. अशा प्रेरणादायी तपशिलाचा कार्यकर्त्यांच्या जडणघडणीसाठी आणि चळवळीला धीरगंभीरपणे अविरत मार्गक्रमण करण्यासाठी ममैलाचा दगडफ यासारखा उपयोग होईल. प्रस्तुत पुस्तकात बहुजन संघर्ष समिती, बहुजन संघर्ष पाक्षिक, याबद्दलचा आशय–गाभा मुख्यत्वे विशद केलेला आहे. बहुजन संघर्ष पाक्षिक सुरू होण्यापूर्वीच्या कार्यात या. वा. वडस्कर संपादित 'अभिजात' साप्ताहिकाची सशक्त भूमिका यावरुन लक्षात येते. त्याचसोबत द. भि. कुळकर्णी प्रकरण, कापूस परिषद, बाबा आढाव यांच्या नेतृत्वातील एक गाव एक पाणवठा चळवळ, इत्यादीची दुर्मिळ ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेता येते. नागपूरमध्ये बहुजन संघर्ष समितीच्या पुढाकाराने 'अखिल भारतीय मंडल आयोग परिषद' आयोजित करण्यात आली होती. त्यामुळे तो एकप्रकारे द्रविड आणि सत्यशोधकी विचारांचा संगम होता, ही घटना बहुजन चळवळीच्या गतीमानतेच्या दृष्टीने फार महत्वपूर्ण ठरली. असे लेखिका विवेचन करतात. त्यानंतर बहुजन संघर्षची सुरुवात झाली. आणि मंडल आयोगाचा प्रचार विदर्भात मोठ्या प्रमाणात होऊ लागला.

मंडल आयोग लागू व्हावा या मागणीसाठी दिल्लीला संसदेवर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात बहुजन संघर्ष समितीचा महत्त्वाचा सहभाग होता. नागपूर अधिवेशनात महाराष्ट्र विधानसभेवरही मंडल आयोग लागू करण्यासाठी विराट मोर्चा निघाला होता. विदर्भातून मोठ्या संख्येने मंडल समर्थक सामाजिक राजकीय विद्यार्थी ओबीसी सहभागी होते. हा लढासुद्धा बहुजन संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली लढला गेला. मंडलचा प्रचार त्यावेळी कळीचा बनला होता. विदर्भातील





खेड्यापाड्यात त्याचे लोन पसरत होते. मोर्चे धरणे आंदोलने याप्रमाणेच कार्यकर्त्यांची व्यक्तिमत्व विकास शिबिरे आयोजित करण्यात येत होती. त्यामुळे बहुजन संघर्ष समितीचे विदर्भात अनेक ठिकाणी कार्यकर्ते तयार होऊ लागले.

दोन–तीन दिवसांच्या शिबिरातून कार्यकर्ते घडविण्याची ही अनोखी शक्कल बहुजन संघर्ष समितीने लढविली आणि मंडलच्या प्रचारांसोबतच या देशातील जात–धर्म व्यवस्था, हिंदुत्व (ब्राह्मणी व्यवस्था) समर्थक प्रवाह व समतावादी अवैदिक–द्रविड–अब्राह्मणी–ब्राह्मणेतर–शुद्रातिशुद्र – बहुजनांचा लढा असे दोन परस्पर विरोधी विचारांचे लढे समजू लागले. यासाठी लढणारे कार्यकर्ते त्यातून घडू लागले. ओबीसीमधील तेली कुणबी माळी धनगर आधी जाती व मराठा यांच्यात लक्षणीय परिवर्तनाचे वारे वाहू लागले. त्याचा परिणाम म्हणजे बहुजन संघर्षच्या कक्षेबाहेरही ओबीसी व ओबीसीतील प्रबळ जातींच्या सामाजिक संघटना मोठ्या प्रमाणात उदयास येऊ लागल्या. विविध प्रकारच्या समुदायात प्रबोधनाचे काम उभे होऊ लागले. मोर्चे शिबिरे व तत्सम काही आंदोलनांच्या नोंदी प्रस्तुत पुस्तकातून सुटलेल्या असल्या तरी त्यांचा प्रभावही महत्त्वाचा ठरला.

दरम्यान, बहुजन संघर्षच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांमधून वेगवेगळ्या प्रसंगी बहुजन विचारवंत प्रामुख्याने व्हीटी राजशेखर, बाबा दळवी, बाबा आढाव, गेल ऑम्लेट, रोजा–लीन ओ हॅनलॉन, बी प्रेमानंद, निळूभाऊ फुले, डॉ.आ. ह. साळुंखे, कॉ. शरद पाटील, अण्णा हजारे अशी जुनी जाणती वैचारिक व्यक्तित्वे व नवतरुण कार्यकर्ते यांच्या समन्वयाचा सुंदर वैचारिक मिलाफ होत गेला. कार्यकर्त्यांच्या जडणघडणीत या सगळ्या घडामोडी खूप महत्त्वाच्या ठरल्यात.

बळीराजा उत्सव, सोबत प्रकरण, निर्णय सागर, राम मंदिर–बाबरी मस्जिद वाद, रिडल्स प्रकरण, मनूचा पुतळा हटाव,रावण दहन विरोध, सत्यशोधक समाज अधिवेशने, लोकभाषा संमेलने, मालकरणींचा मोर्चा,ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती आंदोलन,पारधी समाज बांधवांकरीता लढा, पत्रकारितेचे अभ्यास वर्ग इत्यादी ऐतिहासिक कार्यक्रमांतून बहुजन चळवळीच्या वैचारिक व्याप्तीचा अंदाजही येऊ शकतो.

महाराष्ट्रात विशेषतः विदर्भात शेतकरी–आत्महत्यांचे सत्र मन हेलावून सोडणारे. शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होऊ लागल्या असताना बहुजन संघर्षाने विदर्भभर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा करून आत्महत्यांमागील वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला. शेतकऱ्यांचे नेते शरद. जोशी मंडल आयोग अर्थात ओबीसी आरक्षणाला उष्ट्या पत्रावळी म्हणून आरक्षण विरोध करत. त्यांचा खरपूस समाचार बहुजन संघर्षने घेत, शेतकऱ्यांच्या दशेसंदर्भात कारणमीमांसा मांडली. जाती–धर्मावर आधारित असलेल्या शेतकरी कष्टकरी समाजाच्या शोषणाला उजागर करत, महात्मा फुलेंनी आरंभिलेला सांस्कृतिक लढा भक्कम करण्याचे सातत्याने प्रयत्न केले. शेतकरी संघटनेने शेतकऱ्यांच्या दैनावस्थेला धार्मिक–जाती व्यवस्थेवर आधारित शोषण असल्याचे उघड केले नाही. महात्मा फुलेंचे नाव घ्यायचे पण भूमिका घ्यायची नाही, शेतकरी संघटनेची अशी दुटप्पी भूमिका बहुजन संघर्षने उघडी पाडली. ओबीसींसाठी मंडल आयोग म्हणजे शेती निगडित समाजाच्या शैक्षणिक प्रशासकीय आर्थिक प्रगतीचा, आमूलाग्र बदलाचा मार्ग आहे. अशी भूमिका समजावून सांगत सत्यशोधकी परंपरेला मंडल चळवळ जोडण्याचा महत्वपूर्ण टप्पा या काळात बहुजन संघर्षने पार केला. बहुजन संघर्ष आणि नागेश चौधरी यांच्या कार्याचा मोठ्या प्रमाणात गौरव होऊ लागला. विदर्भातील कार्यकर्त्यांनी त्यांच्या योगदानाबद्दल सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेने भाऊंचा सत्कार सन २००२ या वर्षी घडवून आणला. वयाच्या षष्ट्यब्दी पश्चातही त्यांच्या कार्याला गती रहावी. या सदिच्छेने नागेशभाऊंना कार्यकर्त्यांनी मारुती व्हॅन भेट देऊन आनंदोत्सव साजरा केला.

त्यांची एकुलती कन्या चेतना. चेतनाची जडणघडण आणि जागतिक दर्जाची चित्रकार म्हणून लौकिक प्राप्त चेतना यांचाही अल्पसा परिचय या पुस्तकात येतो. चेतना यांनी आईबाबांच्या वयाच्या ८० व्या वर्षा निमित्ताने यंदा कौटुंबिक मिलन सोहळा नुकताच आयोजित केला होता. त्यांच्या जीवनप्रवासातील अनेक वाटसरू त्यानिमित्ताने भेटण्याची ती एक अपूर्व संधीच होती. आयुष्याची ८० वर्षे पार करत असतानाच सामाजिक कार्याचीही अर्धशतकी वाटचाल पूर्ण झाली. पुष्पाताई आणि नागेशभाऊ समतेसाठी बहुजन संघर्ष लढा आचारविचारातून पुढेच पुढे नेत आहेत.

पुष्पाताई निवृत्त होऊन बरीच वर्षे झालीत. पण त्यांचे शिक्षणविषयक काम सुरूच राहिले. शिक्षकी पेशातून निवृत्ती नंतर त्यांनी नागपूरपासून सुमारे चाळीस किलोमीटर अंतरावर असलेल्या दुर्लक्षित पारधी समाज बांधवांच्या वस्तीवर जाऊन त्यांना शिकवण्याचे काम केले. त्यांच्या बोलीतून शिकवले तर त्यांना उत्तम आकलन होईल या ध्येयाने त्यांनी पारधी बोली शिकून घेतली. पारधी बोलीभाषेतील शब्दकोष विकसित करून छपाई केली. पारधीबांधवांकरीता हे सगळं केलं पदरमोड करून. सातत्याने शिक्षणविषयक चिंतनशील केलेले लेखन बहुजन संघर्ष पाक्षिकातून प्रसिद्ध झाले आहेत. नागेशभाऊ चळवळीचे पूर्णवेळ कार्य करणारे त्यांना पुष्पाताईची अवर्णनीय सोबत. वयाच्या ऐंशीच्या पार पोहचलेले हे दांपत्य. दंपती जीवनातील परस्परांशी प्रेम आदर जिव्हाळा या अनन्य भावस्पर्शी विश्वात उत्तुंग वैचारिक झेप आणि सामाजिक बांधिलकीचे अप्रतिम रसायन खऱ्या अर्थाने जीवनमान उंचावणारे असते, ऊर्जादायी असते, याचे वास्तव दर्शन घडते 'नागेशपुष्पा' या दांपत्याच्या भेटीतून...

**अनुज हुलके**

# शेतकऱ्यांना कृउबा समितीची निवडणूकणूक लढवता येणार

## जानेवारीत बाजार समिती निवडणुकीचे पडघम, गोंदियातील ७ बाजार समित्यांच्या निवडणुका?

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य शासनाने १७ नोव्हेंबर रोजी मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र कृषी पणन अधिनियमात धोरणात्मक बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. या सुधारणेमुळे कृषी पतसंस्था व बहुउद्देशीय सहकारी संस्था यांच्या व्यवस्थापन समितीवरील निर्वाचित सदस्य व ग्रामपंचायत सदस्य यांच्यासोबतच आता सर्वसामान्य शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढवता येणार आहे. येणाऱ्या वर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजेच २९ जानेवारीला राज्यातील १८१ कृषी उत्पन्न बाजार समितीसह जिल्ह्यातील ७ बाजार समितीच्या निवडणुका होणार आहेत. या निर्णयामुळे बाजार समिती प्रशासनामध्ये शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष हस्तक्षेप राहणार आहे. शेतकऱ्यांना बाजार समितीमध्ये ज्या अडचणीचा सामना करावा लागत आहे, अशा अडचणी बाजार समिती प्रशासनामध्ये उपस्थित करून त्या सोडविल्या जाणार असल्याचे बोलले जाते.

कृषी उत्पन्न बाजार समितीवर सेवा संस्था, बहुउद्देशीय सहकारी संस्था सदस्यांकडून ११ आणि ग्रामपंचायत सदस्यांकडून चार असे १५ सदस्य शेतकरी प्रतिनिधी निवडले जातात. प्रचलित नियमानुसार बाजार समितीवर सदस्य म्हणून ज्या शेतकऱ्यांची नावे मतदार यादीत असतील असेच शेतकरी निवडणुकीसाठी पात्र ठरत होते.त्यामुळे शेतकऱ्यांना बाजार समित्यांवर मर्यादित प्रतिनिधित्व मिळत होते. सर्व शेतकऱ्यांना बाजार समितीच्या निवडणुकीला उभे राहण्याची २००८ पूर्वी मुभा होती.मात्र २२ जानेवारी २००८ मध्ये अधिनियम दुरुस्ती करून बाजार समिती क्षेत्रामध्ये राहणारा प्रत्येक शेतकरी समितीची निवडणूक लढविण्यात पात्र आहे. तथापि, संबंधित मतदार संघाच्या मतदार यादीत ज्याचे नाव असेल असेच शेतकरी निवडणूक लढविण्यास पात्र असतील, अशी दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर २०१८ मध्ये तत्कालीन युती



सरकारने शेतकऱ्यांना निवडणुकीत उमेदवार होण्याचा मार्ग मोकळा करून दिला आहे. त्यासाठी महाराष्ट्र कृषी

सरकारने या अधिनियमात दुरुस्ती करून मतदानाचा आणि निवडणूक लढविण्याचा अधिकार सामान्य शेतकऱ्यांना देण्यात आला. मात्र यानंतर सत्तारूढ झालेल्या महाविकास आघाडी सरकारने सन २०२० मध्ये २०१८ पूर्वीच्या रचनेप्रमाणे निवडणुका घेण्याचा निर्णय घेत सेवा संस्था, ग्राम पंचायत सदस्यांमधून बाजार समिती सदस्य निवडीची रचना आणली. मात्र ग्रामपंचायती, सेवा संस्था आणि बहुउद्देशीय संस्थांतील एकहाती राजकीय वर्चस्वाला शह देण्यासाठी आता शिंदे-फडणवीस

उत्पन्न पणन अधिनियम १९६३ मधील कलम १३ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. बाजार समिती क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आणि कमीत कमी १० गुंठे शेती असलेल्या शेतकऱ्याला मतदानाचा अधिकार देण्याचा निर्णय राज्य सरकारने जुलै महिन्यात घेतला होता. मात्र, या निर्णयाचा अध्यादेश न निघाल्याने हा निर्णय बासणात आहे. या अधिनियम दुरुस्तीतील पोटकलमात दुरुस्ती करून आता शेतकऱ्यांना थेट निवडणूक लढण्याची मुभा दिली आहे. संचालक मंडळाची रचना पूर्वी प्रमाणेच असेल. संचालक मंडळात १५ सदस्य असतील. त्यात दोन महिला, एक इतर मागासवर्गीय व्यक्ती, एक विमुक्त जमातीतील आणि भटक्या जमातीतील व्यक्ती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील व्यक्तीला प्रतिनिधित्व करता येणार आहे. शेतकऱ्यांना मतदानाचा अधिकार देणारा अध्यादेश अद्याप निघाला नसला तरी शेतकऱ्यांना निवडणूक लढविण्याची मुभा देणारा अध्यादेश तत्काळ काढण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

अधिनियम दुरुस्तीचा निर्णय मुख्यमंत्री कार्यालयातून राज्यपाल कार्यालयाला १८ नोव्हेंबर रोजी पाठवून त्याचा अध्यादेश काढण्यात येणार आहे. गोंदिया, आमगाव आणि अर्जुनी मोर बाजार समिती संदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने यावर निर्णय झाल्यानंतरच या बाजार समितीच्या निवडणुका होणार असल्याचे बोलले जाते.

# राज्य मागासवर्ग आयोग सदस्य श्री.मेश्राम यांना ओबीसी जनगणनेसंबंधी निवेदन



**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य निवृत्त न्यायमूती व आयोगाचे प्रभारी अध्यक्ष चंद्रलाल मेश्राम यांची १८ नोव्हेंबरला गोंदियाच्या विश्राम गृहात भेट घेत ओबीसी अधिकार मंच, ओबीसी संघर्ष कृती समिती, ओबीसी व्हीजेएनटी, एसबीसी समन्वय समिती व ओबीसी सेवा संघाच्यावतीने ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्यात यावे. तसेच मागासवर्ग आयोगातील रिक्त पदे त्वरीत भरण्यात यावे. ओबीसींचे वसतीगृह आणि ओबीसींच्या शिष्यवृत्तीसंबधात सविस्तर चर्चा करण्यात आली. आयोगाचे सदस्य व प्रभारी अध्यक्ष निवृत्त न्यायमुर्ती श्री.मेश्राम यांनी केंद्रसरकारने सेनस्क कायद्यामध्ये सुधारणा करुन ओबीसींची जातनिहाय जनगणना करण्याचा ठराव घेणे गरजेचे आहे.

संविधानाच्या ३४० व्या कलमानुसार ओबीसींसाठी मागासवर्ग आयोग गठित करण्यात आले आहे.या आयोगाने सुचविल्यानुसार कायदे करुन काही लाभ आरक्षण मिळत आहेत. मात्र जोपर्यत ओबीसींची जातनिहाय जनगणना होणार नाही, तोपर्यंत खरा लाभ मिळणार नाही, याकरीता सर्व ओबीसी संघटनांनी व राजकीय पक्षातील ओबीसी नेत्यांनी एकत्र येत ओबीसी जनगणनेकरीता सामाजिक दबाव निर्माण करावा लागले असे सांगितले.

ओबीसी विद्यार्थ्यांचे वसतीगृह व शिष्यवृत्तीचा निधी रखडल्याबद्दल तसेच गोंदिया जिल्हा परिषदेत ओपनमध्ये भंडारा जिल्हा परिषदेत नोकरीवर लागलेल्यांना ओबीसी दाखविण्यात आल्याबद्दल आपण चौकशी करणार असल्याचे आश्वासन दिले.

निवेदन देतेवेळी प्रा. माणिक गेडाम, ओबीसी अधिकार मंचचे सयोंजक खेमेंद्र कटरे, ओबीसी संघर्ष कृती समितीचे कैलास भेलावे, ओबीसी सेवा संघाचे पी.डी.चव्हाण, प्रमोद बघेले, हरिष विश्वकर्मा, व्हीजेएनटी एसबीसी समन्वय समिती तसेच भोई समाजाचे परेश दुरुगकर, लिल्हारे, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे राजेश वाघ, श्री कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# सासू-सासऱ्यांना सोडले वाऱ्यावर

### शहीद पोलिसाच्या पत्नीचा प्रताप आर्थिक लाथ घेऊन केले दुसरे लग्न



**गोंदिया:** डिसेंबर २०११ मध्ये धमदीटोला येथे नक्षल चकमकीत शहीद झालेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या विधवा पत्नीने सर्व आर्थिक लाभ, निवृत्त वेतन व अनुकंपा तत्वावर नोकरी लाटून घेतली. दरम्यान काही काळातच शहिदाच्या निराधार आई-वडीलांना वाऱ्यावर सोडून दिले. एवढेच नव्हे तर नियमांना तिलांजली देत त्या विरांगणाने दुसरे लग्न करुन संसार थाटले. यामुळे शहिदाच्या निराधार वृद्ध आई-वडीलाला रस्त्यावर बुट पॉलिस करुन संसाराचा गाडा ओढावा लागत आहे. या प्रकरणात शहिदाच्या अन्यायग्रस्त आई-वडीलांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे न्यायासाठी धाव घेतली आहे. दरम्यान जिल्हा पोलीस विभाग व राज्याचा गृह विभाग या प्रकरणाला कसे हाताळणार याकडे लक्ष लागले आहे. विशेष म्हणजे मुलगा शहीद झाल्याच्या दु:खासह सुनेची दगाबाजीने ते निराधार माता-पिता चांगलेच हवालदिल झाले आहेत.

तालुक्यातील चांदणीटोला, नागरा येथील मुळ रहिवासी आत्माराम बिंझाडे यांचा मुलगा मनोज हा पोलीस खात्यात नोकरीवर लागला. मुलगा पोलीस झाल्याने बिंझाडे कुटुंबाचे अच्छे दिन आले. दरम्यान करुणा (बदललेले नाव) नावाच्या मुलीशी मनोज याचे समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले. लग्नानंतर बिंझाडे कुटूंब आनंदात राहत होता. त्यातच १ डिसेंबर २०११ रोजी देवरी तालुक्यातील धमदीटोला येथे मनोज बिंझाडे हा कर्तव्यावर असताना नक्षल्यांशी चकमक झाली. या चकमकीत मनोज बिंझाडे शहीद

### निराधाराची पोलीस अधीक्षकांकडे धाव

**अन्यायग्रस्त निराधार आई-वडीलांनी जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे धाव घेतली आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस विभाग या प्रकरणाची चौकशी करुन शहीदाच्या आई-वडीलानना न्याय देणार का? याकडे लक्ष लागले आहे.**

झाला. या घटनेमुळे बिंझाडे कुटुंबावर दु:खाचे डोंगर कोसळले. घटनेनंतर नियमानुसार शहीद मनोज बिंझाडे याची पत्नी विरांगणा करुणा हिला सर्व आर्थिक लाभ विभागाकडून देण्यात आले. एवढेच नव्हे तर विमा पॉलिसीची रक्कम ही करुना हिला मिळाली. त्याचप्रमाणे अनुकंपा तत्वावर तिला नोकरीही मिळाली. तसेच सेवानिवृत्ती वेतन मिळू लागले. मात्र, हे सर्व लाभ लाटून शहीद मनोज यांच्या आई मेहतरीनबाई व वडील आत्माराम बिंझाडे या दोघांची देखभालकडे दुर्लक्ष केले. तसेच पुढील जीवन जगण्याच्या दृष्टीकोनातून तिने दुसरे लग्नही करुन घेतले.

नियमानुसार अनुकंपा धारकानना असे करता येत नाही. हा सर्व प्रकार शासनापासून लपविण्यात आला. अशातच तिला एक मुलगा झाला आहे. एकंदरीत सर्व लाभ लाटून शहीद पोलीस कर्मचाऱ्याच्या पत्नीने मनोजच्या आई-वडीलांना वाऱ्यावर सोडले. यामुळे मुलगा गमावलेल्या त्या निराधार वयोवृद्ध आई-वडीलांना रस्त्यावर बुट पॉलिस करुन हलाखीचे जीवन जगणे भाग पडत आहे.

### मॉडेल कॉन्व्हेंट एण्ड सायन्स ज्यु. कॉलेज येथे बिरसा मुंडा जयंती साजरी

**गोरेगाव:** स्थानीय मॉडेल कॉन्व्हेंट अँण्ड सायन्स ज्यू. कॉलेज गोरेगावमध्ये १५ नोव्हेंबरला जननायक बिरसा मुंडा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कायक्रमाला शाळेचे प्रशासकीय अधिकारी सी. बी. पटले, शाळेच्या प्राचार्या सी. पी. मेश्राम, शाळेचे सर्व शिक्षक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व शाळेतील सर्व विद्याथी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आले. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी भाषणे सादर केले.



# अनाथ, निराश्रीत बालकांना मदत करण्याचा केला संकल्प



**गोंदिया:** संपूर्ण भारत देशात चाईल्डलाईन इंडिया फाउंडेशन, मुंबईच्या माध्यमाने १४ ते २० नोव्हेंबर चाईल्डलाईन से दोस्ती सप्ताह राबविण्यात आला. चाईल्डलाईन से दोस्ती रथाला सेवानिवृत्त मुख्याध्यापिका प्रमिला बेलेकर व इंडियन सोशल वेलफेयर सोसायटीचे संचालक अशोक बेलेकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.

मुलांनी दस नऊ आठ (१०९८) हे हमारे साथ असे म्हणत प्रभातफेरी काढली. आमदार विनोद अग्रवाल, जि.प. अध्यक्ष पंकज रहांगडाले, शहर ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी, महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, कामगार अधिकारी गुणवंत पंधरे यांना चाईल्डलाईफ से दोस्तीचे हाताला बँड बांधून दोस्ती करुन घेण्यात आली. हिरवी झेंडी दाखवून रथाला समोर नेण्यात आले.

सांभाळ आणि सुरक्षिततेची गरज असणाऱ्या अनाथ बालकांना कसल्याही बाबतीत मदत लागली तर अशा बालकांसाठी टोल फ्री क्रमांक १०९८ ला फोन करुन मदत करु, अशी शपथ घेतली. ० ते १८ वर्षाखालील अनाथ, निराश्रीत बालकांना कसल्याही बाबतीत मदत लागली तर अशा बालकांसाठी टोल फ्री क्रमांक १०९८ ला फोन करुन मदत करु अशी शपथ घेतली.

शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये, दिव्यांग विभागाचे विजय ठोकणे यांनी वेगवेगळ्या विभागांना भेट दिली. कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त शिक्षक विजय रंगारी, जिल्हा समन्वयक ज्ञानेश्वर पटले, अमित बेलेकर, विशाल मेश्राम, पूजा डोंगरे, राजेश खोब्रागडे, आनंद रामटेके, जितेंद्र मरकाम, अश्विनी मेश्राम, आरती ठाकरे, भारती धमगाये यांनी सहकार्य केले.

# शेतकरी साहित्य संमेलनाध्यक्षपदी किशोर सानप

**वर्धा:** गुरुकुंज मोझरी (जि. अमरावती) येथे २१ आणि २२ जानेवारी २०२३ दरम्यान आयोजित दहाव्या अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक डॉ. किशोर सानप यांची निवड करण्यात आली आहे. निमंत्रक गंगाधर मुटे यांनी याबाबत माहिती दिली. शेती अर्थशास्त्राच्या जाणिवा समृद्ध करण्यासाठी व साहित्य सारस्वतांची कृषी जगाशी सांगड घालून कर्तव्यासाठी प्रेरित करण्यासाठी हे संमेलन आयोजित केल्या जात असल्याचे ते म्हणाले. राष्ट्रसंतांचे शेती साहित्यातील कृतिशील कार्य डोळ्यापुढे ठेवून हे आयोजन त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी गुरुकुंजला होत असल्याचे मुटे यांनी नमूद केले. डॉ. सानप संमेलनाध्यक्ष तर श्री-गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे स्वागताध्यक्ष असणार आहेत.

नाशिकच्या शेती उद्योग समूह सह्याद्री फार्म्सचे विलास शिंदे हे उद्घाटक, तर प्रमुख पाहुणे म्हणून लेखक डॉ. रवींद्र शोभणे व राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य पुष्पराज गावंडे उपस्थित राहणार आहेत. शेतकरी आत्महत्यांचे विक्राळ रुप, ओला दुष्काळ, उत्पादनातील प्रचंड घट, गत पाच वर्षांपासूनची नापिकी, निर्विकार शासकीय मानसिकता, बळाने होणारा वीजपुरवठा खंडित करण्याचा प्रकार असे व अन्य विषय चर्चेला येतील. मराठी साहित्य विश्वाने याची दखल घेतली नाही. हे त्या विश्वाचा खुजेपण दाखविते. ही उणीव शेतकरी साहित्य संमेलन भरून काढणार असल्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. यापूर्वी वर्धा, नागपूर, पैठण, अलिबाग, मुंबई व अन्य ठिकाणी अशी संमेलने पार पडली आहे.

# गोंदियात वेस्टा कार्यकारिणीची बैठक



**गोंदिया:** इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे, शिक्षण संस्था संचालकांचे संघटन विझनरी इंग्लिश मिडीयम ट्रस्टी असोशिएशन अर्थात ङ्कवेस्टाफ च्या जिल्हा कार्यकारिणीची प्रथम सभा येथील हॉटेल पॅसिफिकमध्ये नुकतीच पार पडली.

कार्यक्रमाची सुरुवात गुजराती स्कूल गोंदियाचे संस्थापक दीपम पटेल यांना श्रद्धांजली वाहून करण्यात आली. यावेळी वेस्टाचे अध्यक्ष म्हणून मुकेश अग्रवाल, उपाध्यक्ष डॉ. नीरज कटकवार, अजय पालिवाल, राजेश गोयल, सहसचिव अनूप बोपचे, कोषाध्यक्ष आशीष अग्रवाल, सहकोषाध्यक्ष नीतेश अग्रवाल, सचिव चेतन बजाज आदींची निवड करण्यात आली.


यावेळी शांतीलाल मुथा फाउंडेशनच्या वतीने प्रयम सोगी (पुणे) व सुमीत चौधरी यांनी मूल्यवर्धन आणि नैतिक शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. मुकेश अग्रवाल यांनी सर्व शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू समजून त्यांच्या विकासाठी वेस्टा सदैव कार्यरत राहील, अशी ग्वाही दिली.

बैठकीला गुजराती स्कूलचे संस्थापक अजय वडेरा, विवेक मंदिर स्कूलचे संस्थापक दिलीप जैन, अॅड. इंद्रकुमार होतचंदानी, आरटीई फाउंडेशन गोंदियाचे अध्यक्ष आर. डी. कटरे, विजय जोशी, प्रशांत लिल्हारे, एस. एस. कटरे, एस. जी. मेश्राम, विलास नागदेवे, अभिषेक अग्रवाल, पंकज सरोट, भूवन बिसेन, स्वप्निल पारधी, हिमांशू बिसेन, राजेंद्र बडोले, जसराजसिंग भाटिया, सुरेंद्रसिंग सलुजा, राजेश गोयल, संध्या राव प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन चरणसिंग जुनेजा यांनी केले. आभार प्रोग्रेसिव्ह ग्रुप ऑफ स्कूल्सचे संस्थापक डॉ. नीरज कटकवार यांनी मानले.

# कोहमारा-गोंदिया मार्गावर वेग मर्यादेवर नियंत्रण कुणाचे?

**सडक अर्जुनी :** कोहमारा ते गोंदिया या वर्दळीच्या मार्गावरील पाटेकरजवळ कालपरवा झालेला अपघात अन तीन जणांचा झालेला मृत्यू यामुळे समाजमन सुन्न झाले. या मार्गावरून काळी-पिवळीची संख्या घटली असली, तरी अन्य वाहने अजूनही सुसाट धावत आहेत. या मार्गावर वेगमर्यादा नाहीच, असेच चित्र आहे. त्यामुळे पुन्हा मोठ्या अपघाताची वाट प्रशासकीय यंत्रणा तर पाहात नसावी ना? असा प्रश्न उपस्थित होत आहे. अरुंद रस्ते आणि भरलेल्या मुरमाच्या कडा अपघाताला आमंत्रण देत आहेत.

बुधवारी (ता.१६) सकाळी साडेआठ ते पाउने नऊच्या सुमारास कोहमारा, सडक अजुर्नी, परसाडी, डव्वा आदी ठिकाणाहून प्रवासी घेवून गोंदियाकडे काळीपिवळी निघाली. गोंदियाकडून शासकीय धान्याचा ट्रक येत होता. पाटेकुर्राजवळ या दोन्ही वाहनांमध्ये समोरासमोर धडक झाली. ही धडक इतकी भयानक होती की, काळीपिवळीचा अक्षरश: चेंदामेंदा होऊन एका प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला. दोन प्रवासी रुग्णालयात नेत असताना मृत्यूमुखी पडले. सहा प्रवासी जखमी झाले. अपघातस्थळी एकच हाहाकार उडाला. वेळीच नागरिक धावून आलेत. पोलिस अधिकारी व कर्मचाहीसुद्धा तत्काळ



घटनास्थळी पोहोचलेत. त्यांनी जखमींना तत्काळ दवाखान्यात नेण्याची व्यवस्था केली. अपघात होईल, मृत्यू होईल, असे कोणाच्याही ध्यानीमनी नव्हते. परंतु, अपघात होताच होत्याचे नव्हते झाले. यापूर्वदिखील डव्वाजवळील अरुंद रस्ता व कमी उंचीच्या पुलावरून पाण्यात ट्रॅक्टर पडल्याने तीन जणांचा मृत्यू झाला होता. उल्लेखनीय म्हणजे, या मार्गावर वाहने सुसाट धावत असतात. खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे चालक प्रवासी मिळविण्याच्या हव्यासापोटी बेभान होऊन वाहने चालवित असतात. त्यामुळे या मार्गावर आजवर अनेक अपघात घडले. कित्येकजण जखमी झाले. मात्र, वेग मर्यादा पाळण्याचे आवाहन संबंधित विभागाकडून केले जात नाही. ही शोकांतिका आहे. अपघातानंतर दोन-चार दिवस वाहतुकीच्या नियय कडक केले जातात. त्यानंतर सारेच आलबेल असते. हा प्रकार नित्याचाच झाला आहे. यात बळी मात्र, सामान्य प्रवासी पडतो. अरुंद रस्ता, रस्त्याच्या कडेला असलेली झाडेझुडपे आणि रस्त्याच्या बाजूला भरलेल्या मुरमाच्या कडा अपघाताला अधिक कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे संबंधितयंत्रणेने अपघात टाळण्यासाठी ताबडतोब कार्यवाही करणे गरजेचे आहे, असा सूर परिसरातून उमटत आहे.

# प्रभारींच्या खांद्यावर बिडीओंची धुरा

**गोंदिया:** जिल्हा आदिवासी आणि नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात आठ तालुक्यापैकी फक्त तीनच तालुक्यात गटविकास अधिकारी असून त्यातही दोन गटविकास अधिकारी सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत. प्रभारींच्या खांद्यावर गटविकास अधिकारीपदाची धुरा असल्याने जिल्ह्यातील विकासकामे खोळंबलेली आहेत.

गोंदिया जिल्ह्यात आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, गोरेगाव, अर्जुनी मोरगाव, तिरोडा व गोंदिया असे आठ तालुके आहेत. यापैकी आमगाव येथे नुकतेच रुजू झालेले अनिल किटे हे वर्षभरातच सेवानिवृत्त होणार आहेत. गोरेगाव येथे अजितसिंग पवार असून तेही वर्षभरातच सेवानिवृत्त होणार आहेत.

सालेकसा येथे सदाराम



**गोंदिया जिल्हा हा महाराष्ट्रातील एक दुर्गम व नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांची पदे प्राधान्याने भरणे आवश्यक आहे. पदे रिक्त असल्यामुळे विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमबलजावणी करण्यास अडचण निर्माण होत आहे. तसेच नागरिकांची कामे वेळीच पार पडत नसल्यामुळे प्रशासनाविषयी त्यांच्या मनात रोष निर्माण होत आहे.**

**गोविंद खामकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) गोंदिया**

तुरकर गटविकास अधिकारी आहेत. एकमेव तुरकर हे लांब वेळपर्यंत सेवानिवृत्त होऊ शकणार नाही. तर गोंदियाचे गटविकास अधिकारी म्हणून डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांच्यावर कारभार सोपविण्यात आला आहे. त्यांनी आरोग्य विभागाचे काम करावे की खंडविकास अधिकाऱ्याचे काम करावे? असा प्रश्न निर्माण होत आहे. तिरोडा येथे लिल्हारे यांच्याकडे प्रभार सोपविण्यात आला आहे. अर्जुनी मोरगाव येथे विस्तार अधिकारी निमजे यांच्यावर प्रभार सोपविण्यात आला. देवरी येथे सांख्यिकी विस्तार अधिकारी ढोरे यांच्यावर प्रभार सोपविण्यात आला. सडक अर्जुनीच्या गटविकास अधिकाऱ्यांचाही प्रभारच सुरु आहे. जिल्हयात पाच तालुक्यात प्रभारींच्या खांद्यावर गटविकास अधिकाऱ्यांची धुरा असल्याने विकासकामांना ब्रेक लागला आहे.

### पं.स.रिकामी, जि.प.त गर्दी


**नागरिकांनी आपल्या समस्या घेऊन पंचायत समितीकडे धाव घेणे गरजेचे आहे. पंचायत समिती स्तरावर त्यांच्या समस्यांचा निपटारा न झाल्यास पुढचे पाऊल म्हणून जिल्हा परिषदेकडे धाव घ्यायला हवी. परंतु प्रभारींच्या खांद्यावर गटविकास अधिकाऱ्यांचा प्रभार असल्याने लोक पंचायत समितीत न जाता सरळ जिल्हा परिषदेलाच आपल्या तक्रारी घेऊन जात आहेत.**

### गोंदिया, तिरोडात हावे डेप्युटी सीईओ

**गोंदिया व तिरोडा हे दोन तालुके मोठे असल्याने या दोन्ही तालुक्यात डेप्युटी सीईओ दर्जाचे अधिकारी यांच्यावर खंडविकास अधिकारी पदाचा प्रभार देणे अपेक्षीत आहे. परंतु शासनाने आदिवासी व नक्षलग्रस्त असलेल्या गोंदिया जिल्ह्याकडे सपशेल दुर्लक्ष केले आहे.**

# गावाच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेसला संधी द्या:माजी आ. राजेंद्र जैन

**गोंदिया :** सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर, खाद्यतेल व जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत भरमसाठ वाढ करुन सामान्य जनतेचे कंबरडे मोडण्याचे काम केले आहे. त्यामुळे सर्वांना विचार करण्याची वेळ आली आहे. सर्व सामान्य जनतेच्या हिताचे कामे कोण करतो याचा विचार करण्याची वेळ आहे. आम्ही जनतेची सहानुभूती घेण्यासाठी आंदोलनाचा देखावा करीत नाही आणी संकटाच्या वेळी अदृश होत नाही. खा.प्रफुल पटेल यांनी नेहमी सर्वसामान्य लोकांच्या हिताचा विचार करून जनहितार्थ कामे केली आहेत. पक्ष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खा.पटेल यांनी केलेल्या कार्याची जनतेपर्यंत माहिती द्यावी व आगामी ग्रामपंचायत निवडणूकीत सरपंच व सदस्य निवडून द्यावे, असे प्रतिपादन माजी आमदार राजेंद्र जैन यांनी केले.



गोंदिया तालुक्यातील ग्राम निलागोंदी व सोनपुरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पदाधिकारी व कार्यकर्ता बैठक आयोजित होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना जैन बोलत होते. या सभेत आगामी निवडणुकीला सविस्तर चर्चा करण्यात आली. पक्ष पदाधिकारी, कार्यकर्ता व नागरिकांशी आगामी ग्रामपंचायत निवडणूक व अन्य विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करून आढावा घेण्यात आला.

यावेळी घनश्याम मस्करे, केतन तुरकर, निरज उपवशी, डॉ.संदीप मेर्शाम, सुनील पटले, कृष्णकुमार जायस्वाल, नरहरप्रसाद मस्करे, होमेंद्र तुरकर, रमेश धुवारे, वीरेंद्र चौरागडे, मनोज पटले, बालू निखाडे, भूपेंद्र येडे, रतीराम राणे, संतोष पटले, सुनील रामटेके, प्यारेलाल ठाकरे, बाबूलाल ठाकरे, गणेश लिल्हारे, रामचंद्र धुवारे, राजेश बिजेवार, लेखराम गराडे, तिलक चंद दमाहे, हिरदिराम रोकडे, यश जायस्वाल, धर्मेंद्र ठाकरे, नरेश कुमार जायस्वाल, वामेन्द्र बीजेवार, महेंद्र ठाकरे, सहित बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# जात पडताळणी प्रस्ताव प्राधान्याने निकाली काढा-चंद्रलाल मेश्राम

**गोंदिया :** जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरण प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य निवृत्त न्यायमूर्ती चंद्रलाल मेश्राम यांनी दिल्या. त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत जात प्रमाणपत्र, जात पडताळणी व मागासवगीय विद्यार्थ्यांच्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.

जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष महेश आव्हाड, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, सदस्य राजेश पांडे, सहायक आयुक्त समाज कल्याण विनोद मोहतुरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय गणवीर व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी विकास राचेलवार यावेळी उपस्थित होते.

विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रदाने, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, स्व. वसंतराव नाईक गुणवत्ता पुरस्कार, सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षण भत्ता, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती व शिक्षण फी परीक्षा फी प्रदान या विषयाचा आढावा बैठकीत घेण्यात आला.




जात पडताळणी समितीने निर्णय घेतलेल्या प्रकरणातील अपात्र प्रकरणांचा कारणासह अहवाल समितीला सादर करावा असे त्यांनी सांगितले. यासोबतच न्यायालयीन प्रकरणांची माहिती सुद्धा सादर करण्यात यावी असे ते म्हणाले.

जिल्हा जात पडताळणी समितीने माहे नोव्हेंबर २०२२ अखेर शैक्षणिक कामासाठीची १२४३, सेवांतर्गत १४, निवडणूक कार्यासाठीची १६ असे एकूण १२७३ प्रकरण निकाली काढली आहेत. उपायुक्त राजेश पांडे यांनी मागील तीन वर्षात सर्व प्रवर्गातील निकाली काढलेल्या प्रकरणांचा अहवाल बैठकीत सादर केला. सन २०१९-२० मध्ये ४ हजार ६६७, सन २०२०-२१ मध्ये ३ हजार ७९५, सन २०२१-२२ मध्ये ५ हजार ३२२ व एप्रिल २०२२ ते ऑक्टोबर २०२३ पर्यत २ हजार ४४२ प्रकरण समितीने निकाली काढली आहेत.

निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणामध्ये इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील जात पडताळणी प्रस्तावांचा समावेश आहे. शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर कारणास्तव ही पडताळणी करण्यात आली आहे. उपायुक्त राजेश पांडे, सहायक आयुक्त विनोद मोहतुरे व जिल्हा समाज कल्याण अधिकारी संजय गणवीर यांनी यावेळी सादरीकरण केले.

# नऊ महिन्यांपासून राष्ट्रीय मागासवर्ग आयोग अध्यक्षांविना

**नागपूर :** देशात बहुसंख्य असलेला पण सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या इतर मागास वर्गाचे (ओबीसी) संरक्षण करून त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना राबवून प्रगतीच्या वाटा खुल्या करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारला सूचना करणाऱ्या राष्ट्रीय मागास वर्ग आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यात आला. मात्र, त्या आयोगावर गेल्या नऊ महिन्यांपासून अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यही नेमण्यात आलेले नाही. त्यामुळे हा आयोग केवळ नावाला उरला आहे.

देशातील इतर मागास वर्गाचा आवाज ऐकण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १४ ऑगस्ट १९९३ रोजी राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात आला. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या परिस्थिती आणि अडचणी तपासण्यासाठी आणि योग्य शिफारसी करण्यासाठी हा आयोग आहे. केंद्रीय सामाजिक न्याय खात्याकडे आयोगाच्या शिफारसी जातात. केंद्रात भाजपचे मोदी सरकार आल्यानंतर २०१७ मध्ये आयोगाला घटनात्मक दर्जा देण्यात आला. भारताच्या राष्ट्रपतींनी नियुक्ती केलेल्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि तीन सदस्यांसह पाच सदस्यांचा समावेश आयोगात असतो. केंद्रात यूपीएचे सरकार असताना आयोगाचे अध्यक्ष म्हणून न्यायमूर्ती व्ही. ईश्वरैया (२०१३ ते २०१६) होते. त्यानंतरच्या सरकारने डॉ. भगवान लाल साहनी (२०१९ ते २०२२) यांची आयोगाच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. डॉ. साहनी यांचा कार्यकाळ संपला आहे. तसेच आयोगाचे उपाध्यक्ष आणि तीन सदस्यांचेही कार्यकाळही संपुष्टात आले आहे. त्यामुळे आयोगाचे काम ठप्प झाले आहे.




## "आयोगाचे कोणीही प्रतिनिधी नाही"

**आयोगाचा कार्यकाळ ७ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आला आहे. त्यामुळे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्यांचे पद रिक्त आहे. राष्ट्रीय मागासवर्ग आयोग जिल्हा किंवा राज्य पातळीवर आपले प्रतिनिधी म्हणून नियुक्त करीत नाही. पण काही अनधिकृत व्यक्ती आयोगाचे प्रतिनिधी असल्याचा दावा करीत असल्याचे दिसून आले आहे, असे पत्र राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे प्रशासकीय अधिकारी बिजेंद्रकुमार यांनी काढले आहे.**

ओबीसींना आरक्षणचा लाभ घेण्यासाठी आठ लाखांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा घालण्यात आली आहे. त्यासाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक आहे. गेल्या पाच वर्षांपासून ही उत्पन्न मर्यादा वाढवण्यात आलेली नाही. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाबाबतच्या तक्रारी आणि कल्याणकारी उपाय तपासण्याचे अधिकार आयोगाकडे आहेत. तसेच नवीन आयोगाकडे मागासवगीयांच्या तक्रार निवारणाचे कार्य सोपविण्यात आले आहे. आयोगाचे अध्यक्ष नसल्याने हे काम ठप्प झाले आहे.

## गोरेगाव पंसमध्ये सहा.गटविकास अधिकारी गौतम रूजू

**गोरेगावः-** गोंदिया जिल्हा परिषदेंतर्गत येत असलेल्या गोरेगाव पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी म्हणून पदोन्नती मिळालेले अधिक्षक एच.व्हि.गौतम यांनी (दि.२१) सहाय्यक गटविकास अधिकारी पदाची सुत्रे स्विकारली.सहा.गटविकास अधिकारी गौतम यांचे कार्यालय अधिक्षक संजय बनकर यांच्यासह सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी त्यांचे स्वागत केले.

# आरोग्य केंद्रातील रूग्णवाहीकांचा होतो गैरवापर

## विभागाचे दुर्लक्ष, रुग्णांची हेळसांड




गोंदिया-जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात रूग्णवाहीकांची सोय करण्यात आली. ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुदृढ व्हावी, तसेच अतिगंभीर रुग्णांना तातडीने आरोग्य सेवा मिळावी, हा त्यामागचा हेतू. परंतु, या आरोग्य केंद्रातील रूग्णवाहिकांचा उपयोग रुग्णांसाठी न होता इतर भलत्याच कामासाठी वापर होत असल्याचे प्रकार आरोग्य केंद्रात दिसून येत आहे.

विशेष म्हणजे ही समस्या प्रशासनाच्या निर्दशनास आणूनही त्यावर कुठलीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे रुग्णांना अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रुग्णवाहिका उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यातच जिल्हा व ग्रामीण रुग्णालयात सुद्धा ॲम्बुलेंस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या रुग्णवाहिकांचा जेवढा उपयोग रुग्ण आणण्यासाठी होतो तेवढाच दुरुपयोग सुद्धा होत आहे.

काही रुग्णवाहिकेचे चालक तर निव्वळ पैसे लाटण्यासाठी रुग्णवाहिका नादुरुस्त करून पैशांची बंदरबाट करीत असल्याचे सुद्धा प्रकरण आहे. रुग्णवाहिकांचा वापर सध्या औषधी ने आण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात होत आहे. तसेच आरोग्य विभागातील कर्मचारी यांच्याकडे असलेल्या कार्यक्रमातही बघावयास मिळत आहे. काही रुग्णवाहिका तर जिल्हा परिषद आवारात नादुरुस्त पडून आहेत. जिल्ह्यात ८ तालुके मिळून ३९ प्राथमिक आरोग्य केंद्र, २३८ प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय अशी आरोग्य व्यवस्था आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत माता व बाल मृत्यू टाळण्यासाठी रुग्णांना तत्काळ सेवा मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातून अशा रुग्णांना वाहतूक सेवा देण्याकरिता ३०० रुपये प्रती रुग्ण वाहतूक खर्चाची सोय उपलब्ध आहे. यापेक्षा जास्तीचा खर्च रूग्णकल्याण समितीचा अनुदान अथवा गावपातळीवरील आरोग्य पोषण समितीकडून अनुदानित करण्यात येतो.

या योजने अंतर्गत प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता २५ गरोदर व बाळंतपणाशी निगडित मातांसाठी हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. गावपातळीपासून जवळचे प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालय किंवा जिल्हा रुग्णालय यासाठी वाहतुकीकरिता आरोग्य विभागाने वाहने निश्चित केली आहेत. यामध्ये खासगी व शासकीय वाहनांचाही वापर करता येते.

विशेष म्हणजे गरोदर मातेच्या ठिकाणापासून तिला उपचारासाठी पाठविण्यात होणारा खासगी वाहनांचा खर्च त्यांच्या स्थानिक दरानुसार करण्याची मुभा आहे. त्यातच योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्रामसभेमध्ये याची माहिती द्यावी लागते. तसेच गावपातळीवर आशा, अंगणवाडी कर्मचारी, शिक्षक यांनाही सदर योजनेची माहिती असणे आवश्यक आहे. जेणे करून गरोदर मातांना प्रसूतीसाठी वेळेवर व योग्य दरात वाहन मिळेल. परंतु ही योजना व माहिती अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रात रजिस्टर बंद असल्याचे दिसून येते. रुग्णांना सेवेसाठी वाहतुकीचा अनुदान प्रतिकिलोमीटर दरानुसार वाहनधारकास वैद्यकीय अधिकारी यांनी उपलब्ध करून द्यावा लागतो. अशा प्रकारे गरोदर मातांना वाहतूक सुविधा पुरविण्याची योजना आहे.

त्यातच गंभीर आजार अथवा अपघाताच्या वेळीही रुग्णांना या सेवेचा लाभ देता येऊ शकतो. परंतु, अनेकवेळा ग्रामीण भागातील अशा प्रकारच्या रुग्णांना निधी व वाहतूक व्यवस्था उपलब्ध राहूनही रुग्णांना डावलण्यात येत असल्याचे प्रकार हमखास बघावयास मिळतात. या वाहनांचा वापर अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रातकामासाठी करीत असल्याचेही दिसून येते. त्यामुळे खासगी व शासकीय रूग्णवाहिकांचा अनुदान लाटण्यासाठीच सदर प्रकार सुरू असल्याची चर्चाही ग्रामीण भागात दिसून येते.तरी या गंभीर समस्येकडे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने लक्ष देणे गरजेचे झाले आहे.



# कर्मचाऱ्यांच्या कमतरतेने विश्रामगृहांकडे पाठ

## पर्यटकांचा हॉटेल्सकडे कल,बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**गोंदिया:** सरकारी निमसरकारी आणि प्रतिष्ठितांच्या सोयीसाठी तालुकास्थळी सरकारी विश्रामगृहाची सोय आहे. हा आशियाना सांभाळण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. मात्र कर्मचाऱ्यांअभावी येथे येणाऱ्या पाहुण्यांना सोयीसुविधाच उपलब्ध होत नाही. त्यामुळे जिल्ह्यातील पाचही विश्रामगृहांना अखेरची घरघर लागली आहे.



जिल्ह्यात गोंदिया, गोरेगाव, सालेकसा, आमगाव, देवरी येथे विश्रामगृहाच्या प्रशस्त वास्तू उभारण्यात आल्या. येथे येणाऱ्या अभ्यागतांना सर्व मूलभूत सुविधा मिळणे आवश्यक आहे. मात्र शासनाने या विश्रामगृहात लागणाऱ्या विविध पदांची भरती प्रक्रिया न राबविल्याने अनेकांनी खासगी हॉटेलकडे आपला मोर्चा वळविला आहे. केवळ मंत्री आमदारांचे दौरे, बैठका यापुरतेच ही विश्रामगृहे राहिली आहेत.

वर्षाकाठी येणारा महसूलही तोकडा असल्याने हव्या त्या प्रमाणात देखभाल व्यवस्था होत नसल्याचे बांधकाम विभागातील वरिष्ठांचे म्हणने आहे. गोंदियातील विश्रामगृहात दोन स्वयंपाकी व एक मजूर नियुक्त आहे. तर अन्य ठिकाणच्या विश्रामगृहाची व्यवस्था बांधकाम विभागातील कुण्या एखाद्या कर्मचाऱ्यावर टाकण्यात आली. कायमस्वरूपी कर्मचारी नसल्याने बिनभरवयशाचा कारभार पाहायला मिळतो.

गोरेगाव विश्रामगृहाची अवस्था भयावह आहे. येथे रात्रीच्या वेळेत कुणीही हजर नसतो. बाहेरगावावरून कुणी अभ्यागत तत्काळ स्थितीत आल्यास बांधकांम विभागाची कमालीची धावपळ उडते. याशिवाय विश्रामगृहाच्या परिसरात योग्य साफसफाई होत नाही. भिंतीला रंगरगोटी नाही. छतावरील कवेलू फुटल्याने गळती लागली आहे. पावसाळ्यात तर या विश्रामगृहात न गेलेले बरे, असा विचार येथे येणारे करतात. शासनाचे कुठलेही ठोस धोरण नाही.

विश्रामगृहांना सद्यःस्थितीत वनवास आला आहे. उल्लेखनिय म्हणजे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहांवर शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी आणि स्थानिक नेत्यांनी अतिक्रमण केल्याचे दिसून येत आहे. कित्येक अधिकारी भाड्याची खोली न घेता तीन ते सहा महिने विश्रामगृहांमध्ये ठाण मांडून आहेत.

याकडेदेखील विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे. काही सामाजिक संघटनांनी या विश्रामगृहाची देखभाल, दुरूस्तीचे काम खासगी व्यवस्थापनाकडे देण्याची मागणी केली. याकडे लक्ष न दिल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

जिल्ह्यातील गोरेगाव आणि सालेकसा येथील विश्रामगृहाच्या देखभालीच्या कामाचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे देण्याचे विचाराधीन होते. तसा अहवालही वरिष्ठांना पाठविण्यात आला,पण पुढे काय झाले कुणालाही ठाऊक नाही.दरेकसा,हॉजराफॉलसारखे स्थळ असूनही या भागात विश्रामगृहाची वाणवा ही विभागाची अनास्थाही म्हणावे लागेल.

# विधिसभेतील पदवीधर मतदारसंघासाठी ५९ उमेदवार रिंगणात

**नागपूर:** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विधिसभेतील पदवीधर मतदारसंघासाठीच्या निवडणुकीत सर्व प्रवर्गातील उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात आली असून ५९ उमेदवार रिंगणात राहणार आहेत. अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी केवळ दोघांचे अर्ज अवैध ठरवण्यात आले होते. त्यानंतर बुधवारी अनेक उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्यानंतर अंतिम यादी विद्यापीठाने जाहीर केली.

या यादीनुसार आता खुल्या प्रवर्गातील पाच जागांसाठी ३० उमेदवार आहेत. या गटात हर्षवर्धन




कापसे, ललित खंडेलवाल, अभिजीत मेश्राम, माधुरी पालीवाल आणि वीणा सरदार यांचे अर्ज विविध कारणांमुळे फेटाळण्यात आला आहे.

अनुसूचित जाती गटात एका जागेसाठी ६ उमेदवार, अनुसूचित जमाती गटात एका जागेसाठी पाच उमेदवार, विमुक्त जाती गटात एका जागेसाठी सात उमेदवार, इतर मागासवर्गीय गटात एका जागेसाठी ७ उमेदवार आणि महिला गटात सहा उमेदवार आहेत.

या निवडणुकीसाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची छाननीनंतरची तात्पुरती यादी १२ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध झाली होती. त्यावर, कुलगुरुंकडे अपील करण्यासाठी १३ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. यानंतर बुधवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यानंतर अंतिम यादी जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी ११ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ पर्यंत मतदान होईल. २ डिसेंबर रोजी निवडणुकीची मतमोजणी होईल.

# राष्ट्रीय पवार(पोवार/पंवार) क्षत्रिय महासभेच्या बैठकीत समाज संघटनेवर बळ

## २४ डिसेबंरला कारंजा(वर्धा) येथे अधिवेशन



**गोंदिया:-** राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा ( पोवार/पंवार )भारत कार्यकारिणीच्या झालेल्या त्रैमासिक बैठकीत पोवार, पंवार, परमार, भोयर पवार समाजाला संघटित करुन महासभा बळकट करण्यावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. सोबतच येत्या २४ डिसेंबरला वर्धा जिल्ह्यातील कारंजा येथे एकदिवशीय अधिवेशन आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

महासभचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि.मुरलीधर टेंभरे यांच्या अध्यक्षतेखाली २० नोव्हेंबरला झालेल्या छिंदवाड़ा येथील बैठकीत महासभेच्या पुर्व वरिष्ठ पदाधिकार्यानी केलेल्या कार्याला पुढे नेत विखुरलेल्या समाजाला एकत्रित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या नियमावलीप्रमाणेच सर्वांना जोडण्यात येईल असे ठरवण्यात आले. काहीजन चुकीच्या पध्दतीने समाजात मतभेत निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, त्याकडे कानाडोळा करीत आपल्या पुर्वजांच्या विचारांची देवाणघेवाण व आपसी संबध स्थापन करण्यास महासभा सक्षम असल्याचे विचार इंजि.टेंभरे यांनी व्यक्त केले.

महासभा कार्यकारीणीच्या त्रैमासिक सभेला महासचिव पुष्पा निरंजन बिसेन, संगठन सचिव खेमेंद्र कटरे, उपाध्यक्ष उमेश देशमुख, राजेंद्र पटले, मोतीलाल चौधरी, अशोक बिसेन, किरणलता चोपडे, कोषाध्यक्ष श्रावण फरकाडे, सहकोषाध्यक्ष दिलीप रहांगडाले, सहसचिव मनोज भैरम,जनसवांद सचिव सुनिल गौतम, अंतरराष्ट्रीय समन्वय समिती के अध्यक्ष लेखसिंह राणा, अर्पण बिसेन, आर.सी.पटले, लक्ष्मीकांत गोलू नागरे, जगदिशचंद्र पवार, एड.रुपेंद्र कटरे, नागपूर जिलाध्यक्ष पृथ्वीराज राहांगडाले, छिंदवाडा जिला क्षत्रिय पवार समाज सगंठन अध्यक्ष मुन्ना पवार, श्री वैनगंगा पंवार क्षत्रिय समाज संगठन अध्यक्ष डॉ.एस.आर.पटले ,बालाघाट जिला अध्यक्ष, सिवनी जिला अध्यक्ष,नामदेव बारंगे आदि कार्यकारिणी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पोवार, पवार, भोयर पवार, परमार शाखातील सर्व रजिस्टर्ड संगठनांना महासभेसोबत सलग्न करने. महासभेचे राष्ट्रीय अधिवेशन महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्याच्या कारंजा येथे २४ डिसेंबरला आयोजित करने. महासभेचे आजिवन सदस्य संख्या वाढविण्यासोबतच महासभेच्या नियमावलीत संशोधन करण्यावर चर्चा करुन निर्णय सर्वसम्मतीने पारीत करण्यात आले. यात महासभेच्या निर्वाचित पदाधिकारीकरीता वयोमर्यादा ४५ वर्ष निर्धारीत करण्यात आली. सोबतच पालक सदस्यामध्ये महासभा अध्यक्ष, महासचिव सारख्या पदांना सहभागी करुन दानदाता, सामाजिक कर्मठ व्यक्तींचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. अध्यक्षांच्या अनुमतिने आलेल्या विषयावर चर्चा करुन महासभा ही समाजाला जोड़णारी व बोलभाषेपासून समाजाच्या हक्कासाठी लढणारी सवीच्च संस्था आधीपासूनच आहे आणि पुढेही राहील याची ग्वाही उपस्थितांनी दिली. बैठकीचे संचालन संगठन सचिव खेमेंद्र कटरे यांनी केले तर आभार महासभा उपाध्यक्ष किरणलता चोपडे यांनी मानले. बैठकीचे समापन राष्ट्रगिताने करण्यात आले.



# ओढे-नाले गेले चोरीला कोणी पहिले का?

**गोंदिया:** जिल्ह्यातील नैसर्गिक ओढे, नाले अतिक्रमणाने गिळंकृत केले आहेत. काही ठिकाणच्या नाल्यांवर अतिक्रमण झाल्याने नैसर्गिक पाण्याचा प्रवाह अडला जात असल्याने पावसाळ्यात शहराला तलावाचे रूप प्राप्त होते.

वाढत असलेले शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नवीन बांधकामांना जागा अपुरी पडत चालली आहे. पुर्वी ज्या ओढे, नाले यातून पाण्याचा होणारा विसर्ग यामुळे स्वच्छता राहिली जात होती, ते आता अनेकांनी गिळंकृत केले आहे. अनेक ठिकाणी नगर परिषदेचे पुररेषा आखली आहे. तेथे कोणतेही बांधकाम करण्यासाठी मज्ञाव केला आहे. तरीही अनेकजण तेथे बांधकाम करत असताना दिसून येतात.



### जिल्ह्यात ओढे-नाले, कालवे गायब

◆वाढत्या शहरीकरणामुळे मिळेल तिथे अनाधिकृतपणे बांधकामे केली जात आहेत.

◆शहरातील पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने व्हावा यासाठी पुर्वी ओढे, नाले बांधण्यात आले होते.

◆मात्र हे ओढे, नाले आता गायब होऊन त्यावर बांधकामे झाली आहेत. अनेकदा अतिक्रमण हटविली, मात्र पुन्हा नव्याने बांधकाम झाले.

### अंडरग्राऊंड पाईपलाईनद्वारे पाणी

◆मागील काही वर्षात हे नाले कालबाह्य झाले आहेत. अंडरग्राऊंड पाईपलाईन टाकली असून त्याद्वारे पाणी देण्यात येत आहे.

◆गोंदिया, सालेकसा, आमगाव व देवरी तालुक्यातून गेलेल्या कालव्यावर अनेकांनी अतिक्रमण केले आहे. त्यामुळे कालवे गायब होत असल्याचे चित्र आहे.

### नाल्यावरही बसले झाकणे

◆पुर्वी सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात नाल्या दिसून येत होत्या. मात्र आता त्या नाल्यावरही झाकणे बसविण्यात आली आहेत. त्यामुळे नाल्या होत्या. हेही दिसेनासे झाले आहे. ग्रामीण भागात थोड्याफार प्रमाणात विनाझाकणे बसविलेल्या नाल्या दिसून येतात. परंतु शहरात तर अशा नसल्याचे दिसत नाही. गटारेही पूर्णतः बंद करण्याचे काम सुरु आहे.